Osmania University Library

Call No M83596P

Name Of Book पत्र्याची

Name Of Authur वंशी

UNIVERSAL LIBRARY

OU_192896

UNIVERSAL LIBRARY

# पऱ्याची चाळ

[ दलितोद्धारविषयक सामाजिक कादंबरी ]

लेखक
सत्यवान नामदेव सूर्यवंशी

मूल्य एक रुपया

प्रकाशक—केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगाव, मुंबई
मुद्रक—द्वा. भ. कर्णिक, न्यू टाईम्स प्रिन्टरी, लि., गिरगाव, मुंबई

मीरास —

| | | |
|---|---|---|
| १ | ओळख | ५ |
| २ | चदूची मित्रमडळी | १० |
| ३ | ताराचा गोडवा | १७ |
| ४ | शेठजीचा विचार | २३ |
| ५ | चदूचे बडोद्यास प्रयाण | २९ |
| ६ | चदूची जागृत स्वप्ने | ३५ |
| ७ | मुबईची खबरबात | ४० |
| ८ | ताराची पुनर्भेट | ४४ |
| ९ | चदू परत आला | ५० |
| १० | ताराच्या 'मा' चे पत्र | ५५ |
| ११ | पत्र्याची चाळ | ६० |
| १२ | काकड्याला पत्र | ६५ |
| १३ | खानदानाचा प्रश्न | ६९ |
| १४ | 'चिमणीचें खोपटें' | ७४ |
| १५ | हंगेरियाचा कोल्हा | ७९ |
| १६ | वळणाचे पाणी | ८३ |
| १७ | पत्र्याच्या चाळीचे स्वरूप बदलले | ८८ |
| १८ | गोड शेवट | ९१ |

प्रकरण पहिले

# ओळख

**मृग** नक्षत्र सुरू होऊन आठ दिवस झाले होते. शनिवारी रात्री दहाच्या सुमाराला पाऊस सुरू झाला, तो रविवारी सकाळीं साडेआठच्या सुमाराला उघडला. भेंडीबाजार, नळबाजार, माधवबाग, दोन टाकी, विठ्ठलभाई पटेल रोड ते थेट प्रार्थना समाज आणि चर्निरोड जंक्शनपर्यंत कोठे माडीइतके, तर कोठे कमरेइतके पाणी रस्त्यावर साचले. ट्रॅम्स आणि बसेस बंद पडल्यामुळे व्हिक्टोरियावाल्याना खूप भाव आला. माड्याइतक्या पाण्यातून जलमार्गाने पायी प्रवास करणाऱ्या प्रवाशाची एखादी अचानक येणारी व्हिक्टोरिया खूप त्रेधा उडवून देऊ लागली. खाली चाललेली ही फुकटांतली मजा त्या विभागातील वरच्या मजल्यावर राहाणारी बायकापोरे खिडकीत अगर गच्चीवर उभी राहून पाहात होती. खालच्या मजल्यावर राहाणारी मंडळी मात्र गडबडून गेली होती. रस्त्यावरचे पाणी त्याच्या घरात शिरल्यामुळे म्युनिसिपालिटीचा उद्धार करीत, पाणी ओसरण्याची असे लोक वाट पाहात होते, पण वरच्या मजल्यांतल्या पोरासोराना मात्र वाटत होते, की या पाण्याने आज सबंध दिवस ओसरूनच जाऊ नये.

आतां आम्ही जी हकीगत सांगणार, ती हकीगत अशाच एका जलमय झालेल्या ठिकाणीं चर्निरोड जंक्शनपासून थोड्याच अंतरावर घडून आली. व्हिक्टोरियावाल्याच्या अगर पादचारी लोकांच्या शिव्यांना न जुमानता काही उघडी नागडी पोरे त्या रस्त्यावरील पाण्यात शिवाशिवीचा खेळ खेळत पोहत होती. त्या घाणेरड्या पाण्याचे त्यांना काहींच शुभाशुभ वाटत नसावेसे दिसत होते. घाण पाण्यांत खेळूं नका, म्हणून सांगणारे वडीलधारें माणूसही त्याना नसावेसे वाटले, नाहीं तर

एव्हाना त्याना कोणी तरी रागे भरायला हवे होते. किंवा अशीं वडीलधारी माणसे असूनही त्याना त्या मुलांची पर्वाच नव्हती की काय, कुणास ठाऊक. ती मुले मात्र खेळांत गुंग झाली होती खरी.

त्याच्यातील एक मुलगा सुमारे नऊ वर्षांचा असेल. मारामारी करण्यांत हा मुलगा बराच पटाईत दिसत होता. सर्व मुले त्याच्या आज्ञेत वागत होती. जणूं काय त्या बालटोळीचा नायकच तो. आणखी एक मुलगा होता. या मुलाच्या तोंडातच बळ पुष्कळ होते. घाणेरड्या शिव्या त्याच्या तोंडातून मिनिटागणिक निघत होत्या. या मुलांचा वर्ण अगदीं काळा कुळकुळीत असून नाक बरेच बसके आणि डोळे मात्र त्या मानाने पुष्कळच मोठे असल्यामुळे काही विचित्रच दिसत होते तें ध्यान. पण त्या मुलाच्या शेजारी एक दुसरा मुलगा खिदळत होता. अगदी सुदर हसरे तोंड आणि गौरवर्ण. या मुलाचे वय असावे आठ एक वर्षांचें. रस्त्यावरचें पाणी त्याच्या गळ्याला लागत होते. पोहून थकल्यावर तो रस्त्याच्या कडेलाच एक खांब होता, त्याला जाऊन विळखा घाली. तो सुंदर मुलगा त्या इतर मुलात शोभत नव्हता, पण होता तो त्याच्याचपैकी.

रस्त्यावरचे पाणी ओसरून जावे म्हणून म्युनिसिपालिटीच्या भंग्यांनीं रस्त्यावरची मॅनहोल्स उघडून ठेवली होती. अशा प्रत्येक विवराच्या तोंडाशी त्यांचा एक एक माणूस उभा असून विवरावरून नेहमीप्रमाणें लोखंडी पिंजरे ठेवले होते. या पोरट्यातलें एखादे पाण्याच्या जोरानें त्या छिद्रातून आत देखील जायचें, अशा भीतीने विवराच्या तोंडाशीं उभी असलेली ती माणसे त्याना आपापल्या विवराजवळून शिव्याचा भडिमार करीत दूर हाकलून देत होती. पण अशा शिव्या खाण्याची त्या मुलांना संवयच होती की काय नकळे. त्यांचे आपले हसण्या-खिदळण्याचे आणि त्या घाणेरड्या पाण्यात बुड्या मारण्याचे काम चालूच होतें. त्यांतल्या त्यांत कादे-बटाटे पाटीत भरून चाललेला एखादा घाटी दिसलाच, तर त्यातलें ते काळें पोर तर पाण्यात बुडी

घेऊन त्याच्या पायातही घुटमळे आणि त्याचे कांदे-बटाटे पाण्यात पाडी. तसे झाल्यावर तो घाटी त्या काळ्या पोराला खरपूस चोप देत आहे अशी संधि साधून ती बाकीची टोळी गुपचूप ते कादे बटाटे लाबवून एका सुरक्षित जागी लपवून ठेवी आणि खूप मार खाऊनही न रडणाऱ्या त्या काळ्या पोराला शाबासकी देत. त्यांच्या त्या शाबासकीने ते काळें पोर इतके शेफारून गेले, की 'मॅनहोल'च्या विवराशी उभ्या असलेल्या एका भग्याचीच टिगल करण्यास त्याने सुरुवात केली. त्याच्या अगावर पाणीच उडव, त्याच्या रागाची नक्कलच करून दाखव, त्याला जीभच काढून दाखव अशा माकडचेष्टाही त्याने सुरू केल्या. त्यातच त्याच्या त्या सवंगड्यांचीही भर पडलेली. मग काय विचारता, खूपच चिडला तो भगी. अमगळ शिव्याचा दुसरा पाऊस पाडीत तो त्या काळ्या पोराच्या मागे लागला.

इकडे त्याच वेळीं एक अनपेक्षित प्रकार घडून आला. एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावरून एक किकाळी ऐकू आली. पाण्यांत काही तरी धपकन् पडल्याचा आवाज झाला. वरून एक पाच सहा वर्षांची मुलगी खाली रस्त्यातील त्या भंग्याची व काळ्या पोराची शिवाशिवी पाहाण्याच्या नादात तोल जाऊन खालीं पडली होती. थोडा वेळ काय झालें तें कोणालाच कळेना.

त्या भिकार पोराच्या टोळीतील तो सुदरसा दिसणारा मुलगा एकदम पुढे झाला. वरून पडलेली ती मुलगी त्या मॅनहोलकडे जाणाऱ्या प्रवाहात पडली असल्यामुळे गटागळ्या खात खात त्या मॅनहोलकडे वाहात जाऊ लागली. त्या मुलाने अगदी चपळाई करून त्या मुलीला पकडण्याचा प्रयत्न केला, पण प्रवाहापुढे त्याचेही कांहीं चालेना. तीं दोघेंही त्या मॅनहोलपर्यंत गेली. इतर लोकानीं त्याच्या मदतीला जाण्याचा प्रयत्न केला, पण पाण्यामुळे त्यांना तिकडे लौकर जातां येईना इकडे तो मुलगा आणि ती मुलगी अगदी मॅनहोलच्या जवळ जाऊन ठेपलीं. अजूनही त्या मुलानें त्या मुलीची पकड सोडली नव्हती.

अगदीं जिवाचा आटापिटा करून त्याने त्या मुलीसह मॅनहोलपासून दूर राहाण्याची शिकस्त चालविली होती. मॅनहोलवर पिंजरा होता, पण तो नावालाच होता. हीं दोन्ही पोरे सरळ त्या पिंजऱ्याच्या फटीतून आत गेलीं असतीं!

सगळीकडे एकच धादल झाली.

"चंदू ऽ! चद्या, सोड त्या पोरीला. मरशील रे बेट्या!" कोणी तरी ओरडले.

माडीच्या त्या पहिल्या मजल्यावरूनही कर्कश किंकाळ्या येतच होत्या. अवघी दोनतीन मिनिटेही झाली नसतील. लोकाची प्रचड गर्दी तेथे जमू लागली. मघाशी पाण्यात पोहणारी तीं मुलें पुढे पुढे घुसण्याचा प्रयत्न करीतच होती, पण त्याना त्या गर्दीतून पुढे कोण जाऊ देतो! त्यांनी पुष्कळ दमदाटी दिली, शिव्या खाल्लया, मार देखील खाऊन पाहिला, पण त्यांना कोणी पुढे जाऊ दिले नाही.

थोड्याच वेळानें गर्दी पांगू लागली.

"वाचली पोर. बर झाल!"

लोक म्हणत होते. अजूनही त्या मुलाची पुढे घुसण्याची धडपड चालूच होती. अजून त्या पोराची विचारपूस करून त्याना घरीं घेऊन जाणारें कोणीही आले नव्हते!

"चद्याऽ चद्याऽऽ!"

त्याचा हाका मारण्याचा सपाटा चालूच होता. पण चद्या तिथे होता कुठे! त्या मुलीबरोबर त्यालाही त्या बिल्डिंगच्या वरच्या मजल्यावर नेले होते. त्या मुलीला वाचविण्याच्या धडपडीत त्याच्या पायाला मॅनहोलच्या त्या पिंजऱ्याचा लोखडी पत्रा लागून बरीच मोठी जखम झाली होती.

त्या चार पाच मुलानीं त्या बिल्डिंगमध्ये शिरण्याचा प्रयत्न केला, पण तिथेही गर्दीत त्याचा टिकाव लागेना. बराच वेळ त्या रस्त्यावरच्या पाण्यांत तीं कुडकुडत उभीं राहिलीं. त्यांना तसें उभे पाहून मघाच्या त्या भंग्याचें पुन्हा एकदा पित्त खवळले. आतां त्याने पोलीसांची मदत घेतली.

"हवालदार, या पोरट्याना द्या हो हाकलून."

"हवालदार, आमचा तो चंद्या वर गेलाय्—"

"अरे चल चंद्यावाल्या–" हवालदाराने दम भरला व पोराच्या अंगावर तो धावून गेला. पोरानी समय ओळखून पळ काढला आणि एका कुठल्याशा गल्लीत त्याच्या त्या नायकाबरोबर ती थोडावेळ बेपत्ता झालीं!

★

प्रकरण दुसरे

# चंदूची मित्रमंडळी

**अपघातांत** सापडलेली ती मुलगी म्हणजे शेठ दयाराम घेलाभाई यांची एकुलती एक लहान मुलगी तारा शेठजीचा या मुलीवर अगदी जीव कीं प्राण असे कितीतरी वर्षांनीं त्यांना ती मुलगी झालेली. तिला कुठे ठेवूं नि कुठे नको, असे त्याना वाटायचे. अपघात झाला त्या वेळीं शेठजी आणि त्यांची पत्नी काळबादेवीला व्हिक्टोरियाने गेली होती. सकाळीच त्याचे काय काम निघाले होते, कुणास माहीत. मागें हा प्रकार घडून आला. ताबडतोब शेठजीना आणि त्यांच्या फॅमिली डॉक्टरना टेलिफोन गेला.

चदूच्या पायांतून बराच रक्तस्राव चालू होता. त्याला आपल्या डोळ्यापुढें अंधारी आली असे वाटले. त्याने डोळे झाकले आणि नंतर काय झाले तें त्याला समजले नाही.

थोड्याच वेळाने तो जागा झाला. आपण अगदी मऊ मऊ अशा कशावर तरी पडलो आहो आणि आपल्या अंगावरही काहीतरी उबदार घातल आहे असें त्याला आढळून आले. जवळच एक खूप जाडजूड आणि मोठाल्या मिशांचा पण अगदी प्रेमळ डोळ्यांचा माणूस उभा असून आपणाकडे पाहात आहे असेही त्याने पाहिले. चंदूनें डोळे उघडलेले पाहातांच तो प्रेमळ दिसणारा गृहस्थ आणखी जवळ आला. त्याने चंदूच्या तोंडावरून हात फिरवून त्याला विचारले, " झालास का जागा ? "

" मी कुठ आहे ? "

" तूं माझ्या घरांत आहेस." तो माणूस चदूच्या गालावर हळूच थोपटून म्हणाला, " कुणाचा तूं ? तुझे आईबाप कुठ राहातात ? "

पण शेठ दयारामच्या त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चदूनेच त्यांना प्रश्न विचारला, "पोर कुठं गेली आमची ?"

"पोर ? कोणती पोर ?"

"टिटव्या, कचऱ्या, काकड्या—"

"हां हा, ती पोर!" शेठजी त्याची समजूत घालण्यासाठी म्हणाले, "ती पोर गेली त्याच्या घरी. तुझ घर कुठ आहे तें साग मला. मी तुझ्या माणसाना घेऊन येतो. तुझं नाव काय ?"

"माझ नाव चद्या." चंदू म्हणाला, "आमचीं पार बाहेर उभीं असतील. त्यांच्याकडे मी जातो—"

"छे-छे. तुझ्या पायाला खूपच लागलंय. डॉक्टरनी सागून ठेवलय, की तुला काही दिवस तरी पडूनच राहिल पाहिजे. तुझ्या घरचा पत्ता माहीत आहे का तुला ? कुठ राहाता तुम्ही ?"

"टिटव्या न् काकड्या खालीच उभे असतील. मला घेतल्याशिवाय जाणार नाहीत ते—"

"टिटव्या ? आणि काकड्या ? कोण आहेत ही मुल ? तुझे दोस्त वाटत ? ते केव्हाच गेलेही असतील त्याच्या घरीं!" शेठजी म्हणाले, "तुमच्या बिल्डिगचं नाव माहीत आहे का तुला ?"

"सिताराम बिल्डिग." चदू म्हणाला, "आम्ही सगळेजण तिथंच राहातो."

"सिताराम बिल्डिग काय ? बरं तिथ खोली नंबर कोणता ?" पत्ता उतरून घेत शेठजींनीं विचारले.

"तिथंच दादराखाली. रात्र पडली, की भय्याची नजर चुकवून मी आणि टिटव्या निजतो कधीमधीं काकड्याला आम्ही आमच्यांत घेतों. कचऱ्या न् त्याची ती बहीण किराण्याच्या दुकानापुढल्या फळीवर निजतात."

शेठजी गोंधळून उभे राहिले. त्यांना चदूचे म्हणणें आता कळायला लागले होते. एकूण चदू असाच एक रस्त्यावरचा मुलगा होता तर!

शेठजीनी त्याच्याकडे पुन्हा एकदा पाहिले. किती सुदर तोड होते चंदूचे! असा सुदर मुलगा रस्त्यावर कुठेही पडावा हे पाहून त्याना वाईट वाटले. आज त्याने शेठजीचा दुसरा प्राण म्हणजे त्याची लाडकी तारा वाचविली होती. या त्याच्या उपकाराची फेड आपणास कशानेही करता येणार नाही असे शेठजीना वाटू लागले.

इतक्यात बाहेरून एक कर्कश शीळ ऐकू आली. ती शीळ ऐकून चंदूचे तोड आनदाने फुलून गेले.

"काकड्याऽ" तो ओरडला, "बाहेर काकड्या शीळ घालीत आहे. तोच तो! माझ्यासाठी पोर आली आहेत बाहेर!" असे म्हणून चंदूने आपली दोन बोटे तोडांत घातली आणि बाहेरून आलेल्या त्या शिट्टीला तसलीच शीळ घालून उत्तर दिले. त्यावर आणखी शिट्टया झाल्या. "मला न्यायला आमची पोर आली. मी जातो त्याना भेटायला बाहेर!" बाहेरून शिट्टयांचा गोधळ चालूच होता. "तो काकड्या–कचऱ्या–टिटव्या–" चंदू त्याच्या शिट्टया ओळखून त्याची नावे घेत होता.

"चदू, तुझा पाय पुष्कळच दुखावला आहे बघ. अन् डॉक्टरनी त्याला छान औषध लावलय्." शेठजी म्हणाले, "तुला आता इथच राहिलं पाहिजे थोडे दिवस. जरा थाब ह, मी तुझ्या मित्राना घेऊन येतो." असे म्हणून चंदूच्या उत्तराची वाट न पाहाता शेठजी तेथून बाहेर गेले.

रस्त्यावरचे पाणी आतां ओसरून गेले होते. पलीकडच्या फूटपाथवर चार लहान लहान मुल उभीं राहून शेठजीच्या इमारतीकडे वर पाहात शिट्या वाजवीत होती. जवळच एक अदमासें त्यांच्याच वयाची लहान मुलगी कुडकुडत होती. शेटजींनी त्या मुलांना आपणांकडे येण्यास खूण केली.

साशंक दृष्टीने थोडा वेळ शेठजीकडे पाहून झाल्यावर त्यांच्यापैकीं जरासा मोठा दिसणारा तो मुलगा शेठजीकडे गेला.

"मुला, चंदूला तूं ओळखतोस असं दिसतं. तुम्हाला चदूला

भेटायच असल तर चला या माझ्याबरोबर वर. ती मुलं देखील त्याला भेटायलाच आली आहेत अस दिसतं."

"आम्ही चद्याला न्यायला आलो आहो." तो मुलगा जरा उर्मटपणाने म्हणाला.

"पण त्याला तुम्ही नेऊ शकणार नाही. त्याच्या पायाला खूपच लागलय् डॉक्टरनी त्याला औषध लावलय् आतां, पण निजून राहायला सांगितल आहे कांही दिवस"

"मग आम्ही करू ना त्याला औषध–पाणी. आमच्या तिकडे अयशाबी आहे ना, तिला चागली औषधं येतात करता. आम्ही त्याला घेऊन जातो."

"अरे बाळ, त्याला तुम्ही नेणार कस? त्याला तर उभं देखील राहातां येणार नाही."

"तर मग आम्ही त्याला उचलून नेऊ." तो मुलगा म्हणाला. इतक्या-वेळांत ती इतर मुल देखील त्या आपल्या म्होरक्याला येऊन सामील झालीं. त्याच्यांतला एक अगदी काळा कुळकुळीत दिसणारा मुलगा म्हणाला, "टिटव्या, चंद्याला घेतल्याशिवाय आपण जायचेच नाही. बोलव त्याला." मघाशी याच मुलाने त्या भग्याची खोडी काढली होती. पण त्याला तो आपला पहिला मुलगा म्हणजे टिटव्या दाबून म्हणाला, "काकड्या, तू मधी बोलूं नग. तुझ्याच पायी हा सगळा घोटाळा झालाय्." नंतर तो पुन्हा शेठजीकडे वळून म्हणाला, "शेठजी, आम्ही त्याला घेऊन जायला आलो आहों. त्याला आम्ही सगळे औषधपाणी करू. तो आमचा आहे आणि त्याला आम्ही नेणारच."

त्याची कशी काय समजूत घालावी, ते शेठजींना कळेना. त्यानी आपल्या मागून येण्याची त्याना खूण केली. बाहेर वाटेल तसा धिगाणा घालणारी तीं पोरे एका रांगेनें आत गेली. पुढे त्याचा तो नायक टिटव्या, नंतर काकड्या, मग ती मुलगी आणि शेवटीं त्या मुलीच्या तोंडावळ्या-सारिखा तोंडावळा असणारा एक मुलगा. ती मुलगी मागें वळून हळूच

त्या मुलाला म्हणाली, "कचऱ्या, ह्या बिल्डिंगच्या दादराखालीं जर आपल्याला निजायला जागा मिळाली तर काय मजा होईल, नाही का रे?"

दादर चढून ते सर्व लटांबर वर गेले. शेठ दयारामचा तो ब्लॉक सामानासुमानाने अगदी छान सजवलेला होता. स्वच्छता आणि टापटीप अगदी जिथल्या तिथे! आजुबाजूची ती सामानाची रेलचेल पाहात हळू हळू ती पोरे शेठजीच्या मागून चाललीं होती. काकड्या अगर कचऱ्या एखादी खोडी तर करीत नाहीत ना, ते त्याचा नायक मागे वळून पाहात होता आणि गुपचूप या, असे त्याना डोळ्यानीच खुणावून सांगत होता.

शेवटी जिथे चंदू होता, तिथे ते लटांबर येऊन पोचलें. पांढऱ्या स्वच्छ चादरीच्या खाली मऊ मऊ पराची गादी, डोक्याखाली एक छानदार उशी आणि अंगावर एक लाल ब्लॅंकेट अशा थाटांत चंदू एका लोखंडी खाटेवर झोपला होता. त्याच्या अंगात एक सैलसे पांढरे कुडते असून खिडकीच्या निळ्या काचेतून येणारा प्रकाश त्याच्या मुखावर पडला असल्यामुळे त्याचे तें हसरे तोंड अधिकच सुंदर दिसत होते.

"टिटव्या, मला वाटलच तुम्ही खाली असाल! काकड्या, कचऱ्या नि रखमे, तू देखील आलीस का?"

"आम्ही तुला न्यायला आलो आहो. चल ऊठ. आयशाबी करील तुला औषधपाणी."

"अन् माझ्या भाकरीतून मी तुला भाकर देईन." रखमी म्हणाली.

"चल ऊठ. निजलास काय बायकुसारखा असा?" काकड्या हातवारे करून म्हणाला. त्याला आपल्या दोस्ताला त्या सुंदर बिछान्यावर पाहून तो आतां आपल्यासारखा दिसत नाहीं, कुणीतरी परकाच दिसतो असे वाटलें कीं काय नकळे. त्याने त्याला जवळ जवळ ओढीतच म्हटलें, "चल ऊठ. आम्ही तुला न्यायला आलों आहो."

चदूने उठण्याचा प्रयत्न केला, पण त्याला उठवेनाच. शेठ दयाराम ते पाहून पुढे झाले. "टिटव्या, टिटव्याच तुझ नांव नाही का? तुमच्या या दोस्ताला मी काही कमी पडू देणार नाही. पण त्याला बरा होईपर्यंत तरी इथच राहू द्या. तुम्ही पाहिजे तर रोज या वेळेला येऊन त्याला भेटून जात जा."

"काही नको." काकड्या म्हणाला, "आम्ही त्याला आताच घेऊन जातो."

चदूनें पुन्हा एकदा उठण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या पायांत कळ येऊन तो 'अयाई ऽ' करून परत खालीं पडला.

"आम्ही त्याला उचलून घेऊन जाऊ."

काकड्या हात सावरीत म्हणाला. चदूने असहायपणानें पाहिलें व थोडा वेळ डोळे झाकले. टिटव्या हा सगळा प्रकार गुपचूप पाहात उभा होता. तो काकड्याला म्हणाला

"काकड्या, पोरानो, चद्याला बरच लागलय्. त्याला बाहेर नेल तर आणखी उगीच काहींच्या बाहीच होईल. बरा होईपर्यंत आपण त्याला इथंच ठेवू या."

"पण मग आम्हाला रोज त्याला भेटता येईल का?" मध्येच रखमीच्या भावाने विचारले.

"कचऱ्या, आपण रोज त्याला भेटायला येत जाऊ. मी तुला घेऊन येईन." टिटव्यानें त्याला आश्वासन दिले.

चदूने डोळे उघडून टिटव्याकडे पाहिले. तो म्हणाला, "टिटव्या, आज आपल्या त्या दादराखाली काकड्याला घेऊन नीज रे. मी येईपर्यंत त्याला ती जागा दे. रखमीला न् कचऱ्याला चागला निवारा आहे. पण काकड्या रात्रभर कुठं तरी कुडकुडत बसतो. त्याला तूं तुझ्याजवळ घेऊन नीज."

"बरं." टिटव्या म्हणाला.

काकड्या छाती काढून म्हणाला, " अन् तू असा बायकासारखा रडत बसूं नको फार दिवस. लौकर चागला होऊन आमच्यात ये. "

त्यावर चंदू नुसताच हसला.

थोडा वेळ गुपचूप उभे राहून एकमेकाकडे पाहात हसून झाल्यावर टिटव्या म्हणाला,

" जातो आम्ही चदू. चला रे पोरानो, आता आम्ही उद्यां येऊ बर का तुला भेटायला." असे म्हणून ती पाच लक्तरात गुरफटलेली मुले परत रांगेने बाहेर रस्त्यावर आली आणि माणसाच्या गर्दीत नाहींशी झाली.

★



'तुझ नाव काय' त्या मुलीने गोड आवाजाने विचारिले.

[ पृष्ठ १७

प्रकरण तिसरे

# ताराचा गोडवा

चंदू त्या मऊ मऊ बिछान्यावर पडला होता. कुणाची तरी चाहूल लागली म्हणून त्याने मान वेळून पाहिले. एक मध्यम वयाची आणि पाढरे स्वच्छ पातळ नेसलेली बाई ताराला घेऊन त्याच्या बिछान्याजवळ आली. तिनें चदूकडे बोट दाखवून ताराला उद्देशून कांहीं तरी म्हटले तारा चदूच्या लोखडी खाटेला खेटून उभी होती. चदूकडे पाहून ती अगदी गोड हसली. चदूला तिचे ते सुदर हसणे फार आवडले. तिच्याशीं काही तरी बोलावे म्हणून त्यानें तोड उघडले, पण त्याच्या तोडातून शब्द मात्र बाहेर पडले नाहीत. पाढरे पातळ नेसलेल्या बाईने ताराला वर उचलून चदूच्या बिछान्यावर ठेवले.

"तुझ नाव काय ?" त्या मुलीने गोड आवाजाने विचारले. किती तरी प्रेमळ आवाज होता त्या मुलीचा. चदूनें हळूच हसून उत्तर दिलें,

"चद्या माझ नाव. अन् तुझ नाव काय ते साग ना मला ?"

"माझ नाव तारा. मथुराबाई म्हणते, की तू फार चांगला आहेस. तू मला पाण्यातून बाहेर काढलस. तू चागला आहेस, होय ?" त्या मुलीने बालिश स्वभावाप्रमाणे काहीं तरीच विचारले. अशा गोड स्वभावाच्या मुलीला आपण वाचवले, म्हणून चंदूला काय अभिमान वाटला ! उत्तरादाखल त्याने नुसतेंच स्मित केले आणि त्या लहान मुलीच्या सोनेरी केसाबरोबर खेळत हळूच तिच्या गालावर चापटी मारली. त्यानें तसे केल्यावर त्या मुलीला काय वाटलें कुणास ठाऊक, तिनेंही [illegible]च्या डोक्यावर तसेच थोपटून त्याला म्हटलें, "तू चागला आहस रे, पण तू इथच राहाशील का माझ्याबरोबर खेळायला ? चल, मी तुला माझा सगळा खेळ दाखवितें."

" माझा पाय दुखतो ना. " चंदू म्हणाला, " मला इथून उठवत नाही, म्हणून तर मी आमच्या पोरांच्या बरोबर गेलो नाही. बर वाटेपर्यंत मला इथच निजून राहिल पाहिजे "

" मग बर झाल्यावर येशील का माझ्याबरोबर ? मग खेळशील का माझ्या सग ? " ताराने विचारले.

" बर झाल्यावर ? बर झाल्यावर मी नाही राहाणार इथ " चदू म्हणाला, " मग मी आमच्या पोरांबरोबर जाईन. "

" कुठ आहेत रे तुझी पोर ? " ताराने विचारले.

" आमची पोर ? तीं असतील आता आमच्या त्या गल्लीत. मला ती दररोज भेटायला येतात. आज गेलीत भेटून ती उद्या ती परत आल्यावर मी तुला दाखवीन आमची पोर, बर का. " चदू म्हणाला. ताराला ते समजले किवा नाही कुणास ठाऊक. तिने जणू काय त्याचे सगळे बोलणें समजले असें दाखवून मान डोलावून म्हटलें, " ह. मग दाखव बरं का मला. " तिचे ते मान हालवणे आणि साराच अभिनय इतका गोड होता, की चदूला ती मुलगी फार आवडायला लागली. त्याने तिच्या भुरू भुरू उडणाऱ्या केसावरून पुन्हा एकदा हळूच हात फिरवला.

पण तितक्यात एक व्यत्यय आला. एक मथुराबाईच्याच वयाची बाई आत आली. या बाईच्या अगावर अगदी झिरझिरीत असें पातळ होते. शरीर किंचित स्थूल असून दिसायला ती बाई सुंदर असली, तरी तिच्या मुद्रेवर अशा तऱ्हेचा भाव दिसून येत होता, कीं बघताक्षणीच पाहाणाराचे मत तिच्याविषयी प्रतिकूल व्हावे. चंदूला तर ती बाई बिलकुल आवडली नाही. त्या बाईला पाहून ताराची मात्र कळी फुलली.

" मा, बघ ना ग हा चदू. मला हा फार आवडतो ग मा. माझ्याबरोबर हा चांगला खेळतो."

पण ताराचे ते बोलणे जणु काय आपण ऐकलेच नाही असे दाखवून आणि कपाळावर आठ्या चढवून ताराची मा मथुराबाईवर खेकसली.

"मथुरे, तुला काही अक्कल आहे का? उचल उचल तिला तिथून. कुठल ते पोरग आणल आहे उचलून आणि ठेवलय् घरात. शेठजींना काहीच समजत नाही. कुणालाही आपल घरांत आणून ठेवायच म्हणजे काय?"

"शेठाणीबाई," मथुराबाई काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करीत म्हणाली, पण ताराची मा तिला मध्येच अडवून म्हणाली,

"बोलू नकोस एक अक्षरसुद्धा. उचल त्या पोरट्याच्या बिछान्यावरून माझ्या पोरीला. अन् खबरदार जर पुन्हा तू तिला इकड आणलस तर!"

बिचारी मथुराबाई यावर काय बोलणार! मुकाट्याने ताराला उचलून घेण्यास ती पुढे झाली ताराच्या डोळ्यात अश्रु आले होते. मा आपल्यावर उगीचच्या उगीच कां रागावते तेच तिला कळेना. तिने चदूच्या गालाला हात लावला आणि आपली बोटे त्या गालावरून हळुवारपणे फिरवून मोठ्याने रडायला आरभ केला. ताराच्या त्या प्रेमळ वागणुकीने चदूला ताराविषयीं एकदम जिव्हाळा वाटायला लागला. विशेषत: तिने जेव्हा त्याच्या गालाला हात लावून रडायला सुरुवात केली, तेव्हां तर चंदूच्याही डोळ्यात अश्रु भरले. टिटव्या, काकड्या, रखमी आणि कचऱ्या ही पोर त्याला प्रिय वाटत, त्यांहूनही तारा त्याला प्रिय वाटूं लागली पण मथुराबाईने ताराला केव्हाच उचलूनही नेले होते. जवळच्याच खोलींतून तिच्या रडण्याचा आणि ताराच्या मा चा बडबडण्याचा आवाज त्याला ऐकूं येत होता. तारासारख्या सुंदर स्वभावाच्या मुलीला असली तुसड्या स्वभावाची मा असावी हे काही चदूला पसत पडले नाहीं. काय गोड स्वभावाची पोरगी होती ती तारा. तिचे आणि चदूचे सभाषण झाले, त्यातले वाक्य न् वाक्य चदूला आठवून त्याचा कंठ समाधानाने भरून आला. ताराप्रमाणे गोड सभाषण करणारे त्याला आयुष्यात कोणीही भेटलें नव्हतें. टिटव्या, काकड्या, कचऱ्या हे त्याचे सोबती त्याच्याशीं प्रेमानें वागत. रखमी तर त्याला फार आवडे. केव्हा केव्हां रखमीला तो

आपल्या भाकरींतून भाकरही देत असे. थडीच्या दिवसात त्याने एकदा त्याचा फाटका कोट रखमीच्या अगावर घातला होता. रखमीबरोबर बोलायला आणि तिचे बोलणे ऐकायलाही त्याला फार आवडे, पण त्या साऱ्याना ताराच्या नखाची देखील सर नाही असे त्याला आता वाटूं लागले. छे, तारासारखी गोड पोरगी त्याच्या साऱ्या मोहल्ल्यांत त्यानें पाहिली नव्हती. काय ते तिचे सुंदर हसणे, काय तो कोमल आवाज, काय तो जिव्हाळा. जाता जाता तिने त्याच्या तोंडावरून तिचा चिमुकला हात फिरवला होता ते त्याला आठवले. त्याला वाटले, तो गोड क्षण आपण जन्मांत केव्हाही विसणार नाही. इतक्या प्रेमाने त्याला कुणीही कुरवाळले नव्हते. त्या क्षणाच्या स्मृतीतच त्याने डोळे झाकले. पुष्कळ वेळ त्यानें आपले डोळे झाकलेलेच ठेवले होते. मध्येच एकदा दोनदा तो खुदकन हसला. आपण कां हसलो, ते त्याचे त्यालाच सागता आले नसते.

त्याने डोळे उघडले, तेव्हां खोलीत दुसरे कोणी नव्हते. शेजारच्या खोलींतून ताराच्या रडण्याचा आवाज आता ऐकू येत नव्हता, पण तिच्या माच्या बडबडण्याला अधिक भरते आले होते. ती कुणाशी तरी खूप जोरजोराने भाडल्यासारखे बोलत होती. जरा वेळाने तिचे भाडणही थडावले नंतर काही वेळ असाच गेल्यावर शेठ दयाराम आंत आले.

"हं, काय रे चदू, कसा काय आहेस आता तू!"

"शेठजी, ताराची मा तुमच्याशीं भाडत होती का हो!"

चदूने अनपेक्षित प्रश्न विचारला. तो प्रश्न ऐकून शेठजीचे तोंड खर्कन् उतरले. पण जणूं काय त्याचा तो प्रश्न आपण ऐकलाच नाही असे दाखवीत ते चदूला म्हणाले,

"तुझी तीं पोरं आलीं होतीं का भेटायला?"

"आली होतीं तर!" चदू म्हणाला, "टिटव्या त्याना आणल्या-शिवाय थोडाच राहातोयू. रखमीनं तर आज लाडू आणला होता कुठून तरी—"

"खरं ?" शेठ दयाराम म्हणाले. पण आपण काय ऐकतों तें त्यानाच कळत होतें की नव्हते, कुणास माहीत. ते आपला कसला तरी विचार करण्यात गढून गेले होते. चदू पुढे म्हणत होता,

"खरच ना ती आल्याबरोबर मला म्हणाली, 'चद्या, तुला मी एक जम्मत आणलीय्' मी म्हणालो, 'काय जम्मत आणलीस ग ? साग तरी.' तिनं पाठीमाग हातात लपवून ठेवलेला लाडू काढला नि मला देत ती म्हणाली, 'लाडू. मला त्या आपल्या कोपऱ्यावरच्या मिठाईवाल्याच्या दुकानापुढे मिळाला. एका शेठाणीच्या पोराच्या हातून खाली पडला. मग उचलला मी नि आले पळून !"

शेठजी ते सारे लाडूपुराण ऐकत होते की नव्हते, कुणास माहीत. चदू मात्र ते सागण्याच्या अगदी रगात आला होता.

"असा त्या रखमीचा माझ्यावर जीव बघा." तो म्हणत होता, "मला तर ती म्हणाया लागली, की आताच चल आमच्याबरोबर म्हणून !"

चदूचे भाषण असे अगदी रगात येत चालले होतें, पण त्याला मध्येच थाबवून शेठ दयाराम म्हणाले,

"चदू, तुला खरच जायला पाहिजे का रे परत ?"

शेठजींचा हा अनपेक्षित प्रश्न ऐकून चदू तर त्याच्या तोंडाकडे पाहातच राहिला. डोळे विस्फारून आणि तोंडाचा आ करून जितकें आश्चर्य दाखविता येणे शक्य आहे, तितके आश्चर्य दाखविल्यासारखें करून जणू काय मूक भाषेतच त्याने शेठजींना विचारलें, "म्हणजे, तुम्ही मला इथच ठेवून घेणार आहात कीं काय ?"

चंदूच्या त्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पाहून शेठजी म्हणाले, "पोरा, तूं माझ्यासाठीं किती मोठी गोष्ट केलीस त्याची कल्पनाही तुला नाहीं ! तुझ्या त्या उपकाराचे थोडे तरी चीज मला केलेंच पाहिजे."

चंदूला शेठजींच्या बोलण्याचा सर्वच अर्थ समजला नाहीं. तो त्यांना कांहींतरी विचारणार होता, इतक्यांत शेठजींनाच काय वाटलें कुणास माहीत, ते बाहेर जाण्यास निघाले. जातां जाता ते इतकेंच म्हणाले,

"बरा तर हो चांगला. मग पुढचें पुढें पाहूं!"

शेठजींची पाठमोरी आकृति दारावाटे बाहेर पडून अदृश्य झाली तरी चंदू त्या दिशेला बराच वेळ पाहात राहिला होता.

★

## प्रकरण चौथे

# शेठजींचा विचार

**टिटव्या,** काकड्या, रखमी आणि कचऱ्या रागेने आत आले. चदूच्या बिछान्याशी येऊन ती सारीं मुले उभी राहिली. त्याच वेळीं ताराच्या माने कशाला तरी आत डोकावून पाहिल पोराचे ते लटाबरच्या लटाबर पाहून तिने रागाने मानेला एक झटका दिला आणि जशी आत डोकावून बघायला आली तशीच ती मागल्या पावलीच चालती झाली.

काकड्याच्या नजरेतून तिचे ते वागणे सुटले नाहीं. तो टिटव्याला म्हणाला,

"टिटव्या, ती इतक्यात हनुमानावाणी तोंडाची बया गेली ती कोण होती रे ?"

टिटव्या काहीं तरी बोलणार होता असें दिसले, पण त्याला बोलायला अवसरही न देता चदू म्हणाला,

"ती ताराची आई. तारा मात्र तिच्यासारखी नाहीं बर का रे. अगदीं गोड स्वभावाची पोरगी आहे तारा. कालच आली होती कीं मला भेटायला. किती छान बोलते न् हसते ती. माझ्याबरोबर तर खूप वेळ बोलत बसली होती ती. मला ती म्हणाली, कीं चदू, तू इथच राहा माझ्या-बरोबर खेळायला. राहाशील ना ? पण रखमे, तुम्हांला सोडून राहायला मी कसा कबूल होईन बर. मी तर कालच ताराला म्हणालो सुद्धां—"

पण हीं शेवटची वाक्ये चदूच्या त्या मडळीने ऐकलीं किंवा नाहीं कुणास माहीत बाहेरून ताराची मा कुणावर तरी खूप आरडून ओरडून तोंडसुख घेत होती, तिकडे त्या सगळयाचेच लक्ष वेधले. ताराची मा खूपच सतापलेली दिसत होती. तिच्या त्या तावातावाने उच्चारलेल्या शब्दातून स्पष्ट असे काहींच ऐकू येत नव्हते, म्हणून ती कशावरून

इतकी सतापली असेल त्याचा अदाज त्या पोराना करता येईना. तिचे तें आरडणे ओरडणे थोडा वेळ ऐकल्यासारखे करून रखमी म्हणाली,

"जाऊ या का रे आपण ते भाडण ऐकायला तिकड ?"

चदूला ह्या वेळपर्यंत ताराच्या आईच्या सतापाचे कारण समजून आलें होतें असे दिसले. तो रखमीला म्हणाला,

"रखमे, जाऊ नकोस तू तिकड. ती ताराची मा तुम्ही मला भेटायला आलात म्हणून ओरडतेय तशी. कालपासून ती तसंच करायला लागली आहे !"

चंद्याचे ते बोलणे ऐकून काकड्याने आणि कचऱ्याने तर हातच सावरले,

"म्हणजे ? तुला ती तशा शिव्या देतिया व्हय ?" कचऱ्या दात ओठ खात म्हणाला, "मग तर चागलच पाणी पाजू आम्ही तिला !" काकड्या म्हणाला, "तिला वाटतयू तरी काय ? झिपरीच धरीन कीं चांगली मी तिची !" रखमीने साथ दिली. टिटऱ्या मात्र जरा वेळ शात राहून म्हणाला,

"चद्या, चल. आजच्या आज आम्ही तुला इथून नेणार !"

टिटऱ्या तसं म्हणायला नि काकड्या टुणकन् उडी मारून चदूच्या खत्राट्याना हात घालायला गाठच पडली. तो चदूला म्हणत होता,

'आत्ताच्या आत्ता आम्ही नेणार तुला. चल ऊठ जरा वेळसुद्धा इथं थांबायच नाहीं."

ह्या वेळपर्यंत बाहेरचे आरडणे ओरडणें कमी होत होत शात झाले आणि दारातून शेठ दयाराम हळूच आत आले. त्याना पाहून टिटऱ्या पुढे होऊन म्हणाला,

"आज आम्ही चद्याला नेणार तो आतां चांगला झाला आहे."

शेठजी त्याच्याकडे पाहून नुसतेच हसले. त्यानीं टिटऱ्याला म्हटले, ' डॉक्टरदेखील तेच म्हणताहेत. त्याला आता जायला कांही हरकत नाहीं. पण माझा विचार जरा निराळा आहे—"

" आम्हाला तुमच कायबी आयकायच नाय् !" कचऱ्या मध्येंच म्हणाला आणि त्याचे पुढचे वाक्य काकड्याने पुरे करीत म्हटले,

" चंद्याला आम्ही घेऊन जाणार "

टिटव्या मात्र काहीच बोलला नाही. रखमीला तर टिटव्याचा रागच आला, पण करते काय ? टिटव्या या पोरांत जरा मोठा असून सारीं पोरे त्याच्या एका शब्दात आहेत हे शेठजीच्याही एव्हाना लक्षात आलेच होते. त्यानी टिटव्याजवळ जाऊन त्याच्या खाद्यावर हात ठेवला आणि ते त्याला म्हणाले,

" तू जरा या खोलीबाहेर माझ्याबरोबर चल. मला तुझ्याशी कांहीं तरी बोलायच आहे."

टिटव्या जरा घुटमळला, पण तो शेठजीबरोबर खोलीबाहेर जाण्यास तयार झाला. टिटव्याचे ते करणे पाहून रखमीने गाल फुगवले. कचऱ्याने आणि काकड्याने तर एक एक डोळा बटाट्याएवढा केला. पण टिटव्या जरा समजसच होता असे दिसले. तो पोराना म्हणाला,

" पोरानो, तुम्ही जरा थाबा इथ ह ? मी आता जाऊन येतो."

" आम्ही देखील येणार तुझ्याबरोबर " काकड्या गुरगुरत म्हणाला.

" टिटव्याला मी आता परत पाठवून देतो. पाचच मिनिटात तो परत देखील येईल."

पोराच्या विरोधाला न जुमानता टिटव्या शेठजीबरोबर बाहेर गेला. शेठजींच्या बसायउठायच्या खोलींत ते टिटव्याला घेऊन आले. भितींशीं लोड व गाद्या बसायला टाकलेल्या होत्या. टिटव्या हा एक भिकारी पोरगा, पण शेठजींनी त्याला एका बैठकीवर बसवून घेतले. नतर घसा साफ करून ते टिटव्याला म्हणाले.

" टिटव्या, चदूची आईबाप कोण होतीं, ते तुला माहीत आहे का रे ?"

हा अनपेक्षित प्रश्न ऐकून टिटव्या जरा गडबडलाच. चंदूचीं आईबापें कोण होतीं, असा प्रश्न आपणास कोणी विचारील ही कल्पनाच त्याला नव्हती. तो शेठजींना म्हणाला,

"चदूची आईबाप ? मला नाही माहीत ती कोण होती ते!"

"बर, तुम्ही राहाता तिथ तरी कुणाला ते माहीत असेलच की "

"छट्. कुणालाच ते माहीत नाही तो किनई अगदी लहान होता तेव्हां आमच्या त्या ठिकाणी रडत रडत आला त्याला तिथं कुणी आणून सोडलं कुणास ठाऊक. तेव्हापासून तो आमच्याच टोळीत राहात असतो."

"काय रे टिटव्या, मी जर चदूला बाहेरगावी शिकायला पाठवल तर चांगल होईल नाही का ?"

पण चदूला बाहेरगावी पाठवून द्यायला टिटव्याची तरी तयारी दिसली नाही. तो एकदम उसळून म्हणाला,

"नाही नाही शेठ, आम्ही चद्याला जाऊ देणार नाहीं. आम्ही त्याला आताच नेणार आमच्याबरोबर."

शेठ दयाराम त्यावर प्रेमळपणाने टिटव्याला म्हणाले,

"टिटव्या, चदू अगदी गोड पोरगा आहे. त्यान माझ्या मुलीला वाचवून माझ्यावर उपकारांची रास करून ठेवली आहे. त्याच्याकरिता कांही तरी चागल कराव अशी माझी इच्छा आहे. आता तुम्ही परत त्याला घेऊन गेलात, तर आयुष्यभर तो तुमच्याबरोबर भीक मागत फिरेल. पण तो जर शिकला सवरला तर चागला होईल आणि तुमच्यासाठी देखील त्याला काही तरी करतां येईल."

शेठजीचे सगळेच म्हणणे काही टिटव्याला समजले नाही. पण शेठजीच्या मुलीला चद्याने वाचविले म्हणून शेटजी चद्यावर खूष झाले आहेत, इतके त्याला समजले. तो शेठजीच्या त्या बोलण्यानतर विचार करीत थोडा वेळ गप्प बसून राहिला. शेठ दयाराम पुढे म्हणाले,

"त्याच जन्माचं कल्याण मी करीन. त्याला मी शाळेत घालीन. चांगला शिकवीन आणि मोठा माणूस करीन. मग तो परत मुबईला येऊन तुम्हाला भेटेल, तेव्हा त्याला चागल्या स्थितीत पाहून तुम्हालाही आनंद वाटेल."

टिटव्या अजूनही विचारच करीत होता. शेठजी चंद्यासाठीं काहीं तरी चांगली गोष्ट करणार असे म्हणतात, इतकें त्याला समजलें होतें. पण अजून त्याच्याने हो म्हणवेना

"चद्याला इथ मुंबईतच ठेवून शिकवा की." तो शेठजींना म्हणाला.

त्याच वेळी ताराची मा शेठजीच्या खोलींत डोकावून आणि मानेला झटका देऊन पाय आपटीत आली तशी परत गेली. तिच्या त्या करण्याकडे दुर्लक्ष करून शेठजी म्हणाले,

"त्याला मला मुंबईला काहीं कारणामुळे ठेवतां येत नाहीं. बाहेर-गावीच ठेवले पाहिजे. टिटव्या, या तुमच्या पोरांत तूंच चांगला समंजस दिसतोस म्हणून तुलाच मीं या गोष्टी सांगितल्या. या गोष्टींत चंदूचें हित आहे. तुझ्या दोस्ताच हित व्हावं असच तुला वाटत असेल नाहीं का ?"

टिटव्या विचार करीत बसला. बराच वेळ तो विचार करीत होता. शेठजी काहीच न बोलतां त्याच्या तोंडावरचे भाव न्याहाळून पाहात होते. शेवटी त्याना हवा तो भाव टिटव्याच्या तोंडावर दिसला असें वाटले. ते टिटव्याला म्हणाले,

"ठरलं तर मग ?"

"ठरल." टिटव्या म्हणाला.

नतर तो व शेठजी चंदू होता त्या खोलींत आले. पाहातात तों पोरांनी चदूला "आताच आमच्याबरोबर चल" म्हणून लकडा लावलेला. टिटव्या पुढे झाला आणि म्हणाला,

"पोरांनो, चंदू आताच आपल्याबरोबर येणार नाहीं. त्याला इथच राहू द्या. अन् चला आपण जाऊं या. मी तुम्हांला बाहेर गेल्यावर सगळं सांगतों."

टिटव्याच हें बोलत आहे का, अशा अर्थानें पोरांनीं त्याच्याकडे पाहिलें. टिटव्या पुढे म्हणत होता,

" चंदू, आमचं काय बोलण झाल ते तुला शेठजी सांगतीलच. उद्यां आम्ही तुला भेटूं. "

असे म्हणून त्याने पोराना खूण केली व तो बाहेर जायला निघाला. मनांत नसतांही निमूटपणे ती पोरें त्याच्या मागून बाहेर गेली. चंदू गोंधळून ते सारे पाहात होता. त्याच्या डोळ्यात, का कुणाला ठाऊक, अश्रु भरत होते. त्याचा कंठही दाटून आला होता !

★

प्रकरण पाचवें

# चंदूचें बडोद्यास प्रयाण

**चंदूबरोबर** बराच वेळ बोलून शेठ दयाराम यानी चदूची समजूत घालून त्यालाही आपलासा करून घेतला. शेठजीचे म्हणणे ऐकून घेऊन बाहेरगावी शिक्षण घेण्यासाठी जाण्यास चदू कबूल झाला. बडोद्याहून शेटजीचा एक जिवाभावाचा मित्र त्या दिवशी मुंबईत आला होता. त्याला जेवायला बोलावून शेठजींनी हळूच चदूची गोष्ट त्याच्याजवळ काढली—

"माझ्या एकुलत्या ताराला वाचवून त्याने माझ्या शिरावर उपकाराचा पर्वत केला आहे. त्याला माझ्यासाठी बडोद्याला घेऊन जा आणि शाळेंत घाल. त्याच्या पैन् पैचा खर्च मी भरीन." वगैरे गोष्टीही शेठजींनी आपल्या त्या मित्राजवळ बोलून दाखविल्या. आपण ताराच्या 'मा'च्या भयाने त्याला मुंबईस ठेवू शकत नाही म्हणून शेठजीना वाईट वाटत होतें. पण ताराच्या 'मा' पुढें त्याचे काहीच चालत नसे. ताराची 'मा' वगळून खरी परिस्थिति जशीच्या तशीच सागण्याचा शेठजींनीं प्रयत्न केला होता. शेटजीचे ते म्हणणे ऐकून त्याचे ते बडोदेकर मित्र, शेठ हिराचंद मंगळदास चंदूला बडोद्याला घेऊन जायला कबूल झाले.

"मी तिथ आहेच. तुम्ही काही काळजी करू नका. तुमच्या मर्जीप्रमाणे सर्व व्यवस्था केली जाईल." शेठ हिराचद म्हणाले, "उद्यां मेलनें मी परत जाणार आहे. तुम्ही त्याची तयारी करा." असें म्हणून त्यांनी शेठ दयारामचा निरोप घेतला.

दुसऱ्या दिवशी सकाळी शेठजींनीं चदूला बरोबर घेतले आणि महिंद्रकर ब्रदर्सच्या स्टोअरमध्ये जाऊन त्याच्यासाठी काही कपडे खरेदी करण्यासाठीं ते बाहेर पडले. शेठजी आणि चदू बाहेर पडतात न पडतात तोंच

त्याना एक कर्कश शिट्टी ऐकू आली. काय आहे म्हणून शेठजी वळून पाहातात, तों त्याच्याबरोबर चालणाऱ्या चदूनेही तशीच शिट्टी वाजवून त्या पहिल्या शिट्टीला प्रत्युत्तर दिले. एका लहान गल्लीतून भरारा दोनचार पोरे पळत बाहेर आली दुसरी कोण ? टिटव्या, काकड्या, रखमी आणि कचऱ्याच होती ती

"चद्या, तू निघालास देखील जायला होय ?" कचऱ्याने विचारले

कचऱ्याच्या त्या प्रश्नाला शेठ दयाराम यानी उत्तर दिले,

"पोरानो, चदू आज पावणेपाचाच्या गाडीनें जायला निघेल, तुम्ही चार वाजता घरी या नि भेटा आता त्याला कपडे आणायला जायच आहे." ते म्हणाले.

"कपडे आणायला जायच ?" काकड्या एकदम मोठाले डोळे करून आश्चर्य दाखवीत म्हणाला, "चद्या आतां साहेब बनणार कीं काय सूटबूटवाला ?"

"अगदी साहेब बनवायच त्याला आता बर का. बिलकुल साहेब !" शेठजी म्हणाले.

"बिलकुल ?" ती चारी पोरे आश्चर्याने म्हणाली. चदू गालातल्या गालात हसला मात्र.

"बर आहे, पोरानो, जा तुम्ही आता, अ ? अन् नक्की चार वाजतां घरी या बर का माझ्या ?" शेठजी म्हणाले.

ते ऐकून टिटव्या जरा पुढे होऊन म्हणाला,

"शेठजी, आम्ही पण येतो ना तुमच्याबरोबर दुकानात चंदूचे कपडे घेऊं लागायला. अ ?"

टिटव्याचें म्हणणे काकड्याला एकदम पसत पडले, "वा वा वा आपण गेलो नाही, तर चदूचे कपडे कोण पसंत करणार मग ? आपण तर जायलाच पाहिजे त्याच्याबरोबर."

"कचऱ्याला नि मला पण न्या रे तुमच्या बरोबर." रखमी म्हणाली.

"अग चल ना." काकड्या पुढे होत हातवारे करीत म्हणाला, "तुला नको म्हणतोय कोण?" पण शेठ दयारामना काहीं ते पसंत पडले नाही. ते त्या पोराना म्हणाले, "पोरांनो, तुम्ही नका येऊ आता माझ्याबरोबर. आम्हीच दोघे जातो नि कपडे खरेदी करून येतो. तुम्ही चार वाजता या भेटायला याला. आता जा, पळा."

पोरानी चिमणीसारखी तोंडे करून आपली नापसंती दाखविली. ते पाहाताच चंदू म्हणाला,

"याना घेतल तरच मी दुकानात येतो. नाही तर मी नाही येत मग. अन् मग मी बडोद्याला देखील जाणार नाही शिकायला. मी याच्याचबरोबर जाईन मग."

शेठजीनी जरा वेळ थाबून म्हटले,

"पोरानो, तुम्हाला सगळ्यानाच काही मी नेणार नाहीं बरोबर. पाहिजे तर टिटव्या, तू चल आमच्याबरोबर."

"टिटव्या तू चल" म्हणताच इतर सगळयानीच डोळे वटारून आणि नाकतोंड मुरडून आपली नापसंती दाखवली. शेवटीं टिटव्यालाच काय वाटले कुणाला ठाऊक, तो शेठजीना म्हणाला, "मग शेठजी, तुम्ही दोघेच जा. मी याना सोडून येत नाहीं." नतर चदूच्या कानांत टिटव्यानें कांही तरी सागितले आणि इतर पोरांना डोळ्यांनीच खुणावून त्यानें त्यांना म्हटले, "आपण याच्या बरोबर जाणार नाही पण शेठजी, तुम्ही चंदूला चागले कपडे घेतल्यावर ते आम्हांला पण दाखवा, बरं का?"

"दाखवायचे तर! ते सर्व कपडे तुम्हाला जरूर दाखवायचेच." शेठजी खूप होऊन म्हणाले व चदूला घेऊन चालू लागले. शेठजी आणि चदू काही पावले गेल्यावर टिटव्याने पोराना आपल्या मागून येण्याची खूण केली आणि एका लहानशा गल्लीत तो घुसला.

इकडे शेठ दयाराम आणि चदू महिंद्रकर ब्रदर्सच्या स्टोअरमध्यें आले. पण पाहातात तो टिटव्या, काकड्या, रखमी आणि कचऱ्या त्यांच्याही अगोदर त्या स्टोअरपुढें उभी! त्यांच्याकडे दुर्लक्ष करून

शेठ दयाराम चदूला घेऊन त्या स्टोअरमध्ये शिरले व त्यांनी चदूला कपडे घेण्यास सुरुवात केली. त्याचे कपडे घेणे चालू असता बाहेरून तीं पोरें चदूला आतले एक एक कपडे बोटाने म्हणावून दाखवून, 'ते घे' म्हणून सुचवीत होती


चदूचे कपडे घेऊन झाल्यावर शेठ दयारामना काय वाटले कुणास ठाऊक; त्यांनी त्या सर्व पोरांना आत बोलावून त्यानाही दोन दोन कपडे घेऊन दिले. टिटव्या, काकड्या आणि कचऱ्या आपापल्या विजारीकडे आणि शर्टकडे पाहून तर दिपूनच गेले आणि रखमीला तर तिच्या परकरपोलक्याचा वास देखील आवडायला लागला! भराभरा त्यांनीं आपल्या अंगावरच्या चिध्या उतरून ठेवून ते नवीन कपडे अगावर चढवून टाकले. टिटव्या खरा दूरदर्शी. त्याने दुकानदाराजवळून एक वर्तमानपत्राचा कागद मागून घेतला आणि त्यात ती सगळी लक्तरें गुडाळून काखोटीला मारली.

चार वाजेपर्यंत ते कपडे घालून ती बालटोळी ऐटीने सगळ्या गिरगांवांत मिरवून आली

चार वाजता शेठ दयारामचा निरोप घेऊन चदूसह शेठ मंगळदास बडोद्याला जायला निघाले. आपली रखमी, टिटव्या, काकड्या आणि कचऱ्या वगैरे मंडळी पायींच स्टेशनवर जाऊन बसली होती. चदू आणि शेठ मगळदास दिसतांच त्यानी मोठ्याने ओरडून त्यांचा जयजयकार केला!

शेठजीनीं तिकिट काढले आणि चदूला घेऊन ते गाडींत बसायला गेले. तिकिटकलेक्टर उभा असतो, तेथे चदूची ती मित्रमंडळी उभी राहिली होती जातां जातां चदूने त्याचा निरोप घेतला,

"टिटव्या, काकड्या, रखमे, अन् तूं कचऱ्या, जातो आतां मी. लौकरच परत येईन मी बर का रखमे. अन् टिटव्या तूं या काकड्याला तुझ्यांत घेऊन निजत जा रे."



जाता जाता चंदूने त्याचा निरोप घेतला.

[ पृष्ठ ३२

पोरानीं त्याला गुपचूप निरोप दिला. गाडी हालेपर्यंत तीं त्या लोखंडी गजाशीं आपली डोकी टेकून चदूकडे पाहात उभीं होतीं. गाडी दृष्टीच्या टप्प्याबाहेर जाईपर्यंत ती तशीच तेथे राहिलीं. नतर टिटव्या म्हणाला, "चला रे पोरानो, गेला आता चंद्या शिकायला."

जड पावलानी ती पोरे मागे वळली. रखमी तर रडायलाच लागली. काकड्या बेजबाबदारपणानें बळेच काहींतरी बोलून आपणांस काहीच वाटत नाहीं असे दाखविण्याचा प्रयत्न करीत होता, पण त्याला तें साधत नव्हते. कचऱ्याने रखमीचा हात धरून टिटव्याला विचारले,

"चद्या आता कधी परत येईल रे टिटव्या?" टिटव्याने कांहीं तरी बोलण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या कठातून शब्दच बाहेर पडला नाहीं.

क्राफर्ड मार्केटमधून पायधुणीकडे तीं मुले गेलीं. तेथून नळबाजारात तीं आली. एके ठिकाणी एक आरसा होता. काकड्या चालता चालता एकदम उभा राहिला,

"पोरानो, आपण कसे काय दिसतो ते ह्या आरशात शेवटचं पाहून घ्या."

"म्हणजे?" कचऱ्याने विचारले.

"म्हणजे आता आपण जुन्या बाजारात जाणार!" टिटव्या डोळे मिचकावून म्हणाला.

"कशाला?" रखमीने विचारले.

"आपल्या अगावरचे हे कपडे विकून टाकायला." टिटव्यानें शांतपणानें उत्तर दिलें.

"पण का?" कचऱ्या रडकुंडीला येऊन म्हणाला.

"कचऱ्या, बेट्या तुझ्या बापाने हे कपडे पाहिले, तर तो ते तुझ्या अंगावर ठेवील होय? कपडे परी कपडे जातील आणि पैसेही मिळणार नाहीत. तुझ्या बापाच्या दोन चार लाथा मात्र मिळतील तुम्हांला वरती!"

"ही: ही: ही:" काकड्या हसून म्हणाला, "अन् माझा तो थोरला भाऊ आला तर माझ्या कपड्याच देखील तेंच होणार. त्यापेक्षा पैसा करून पोटाला खाल्लं तर काय वाईट ?"

कचऱ्याला आणि रखमीला ते सारे पटले. त्या सगळ्यांनीं मिळून रस्त्यावरच्या त्या आरशात आपला औट घटकेचा थाट पाहून घेतला. नंतर त्यानीं आपापल्या अगावरून ते नवीन कपडे उतरून ते टिटव्या-जवळ दिले आणि त्याने वागवीत आणलेल्या त्या जुन्या मळीव चिंध्या पुन्हा अगावर चढविल्या. नतर काकड्यामागून मुकाट्यानें चालत जाऊन तीं सारीं पोरें जुन्या बाजाराच्या गर्दींत नाहीशीं झालीं.

★

प्रकरण सहावे

# चंदूचीं जागृत स्वप्नें

**शेठ** हिराचदजीकडे एक रात्र राहून दुसऱ्या दिवशीं जवळच एक शाळा होती तिकडे चदू शेठजीबरोबर गेला. शाळेतील काही मुले शाळेला लागूनच एक विद्यार्थ्यांचे वसतिगृह होते तेथे राहात. चदूलाही तेथेच ठेवण्याचे ठरले

सुमारें दहा वाजण्याच्या सुमारास शेठ हिराचद चदूला घेऊन त्या शाळेत आले. शाळेच्या मुख्याध्यापकाशी शेठजींची चागली ओळख होती. त्यानीं पुढे होऊन शेठजींचे स्वागत केलें आणि चदूची अगदीं जिव्हाळयानें विचारपूस केली अगदी प्रथमदर्शनीच चदू त्याना फार आवडला होता. त्यानीं त्याला वसतिगृहात ठेवण्याचे आनदानें कबूल केलें व त्याची राहाण्याची जागा वगैरे दाखविण्यासाठीं ते त्याला घेऊनही गेले.

वसतिगृहात मुलेंच मुले दिसत होतीं. कित्येक चदूहून मोठालीं तर कित्येक अगदीं त्याच्याच वयाचीं. या मुलाबरोबर चदूची ओळख व्हायला उशीर लागला नाहीं. त्यातलीं एक दोन मुले तर चंदूच्या चांगलींच परिचयाचीं झालीं. अशा रीतीनें सुरुवात तर छान झाली. पण लौकरच परिस्थिति बदलूं लागली. वसतिगृहातील मुलाना चंदूबरोबर राहाणें आवडेना. तीं त्याच्याशीं तुसडेपणा दाखवू लागलीं. त्याच्यातील कित्येक मुलाहून चंदू दिसायला सुंदर होता, पण त्याच्या तोडातून फार वाईट शिव्या बाहेर पडत. शिव्यासारख्या क्षुल्लक गोष्टीचा बाऊ ही पोरे का करतात, तें चंदूला समजेना. त्याच्या डोळयापुढे टिटव्या, काकड्या, रखमी आणि कचऱ्या वगैरे पोराची तोडे दिसूं लागत. आपल्या साऱ्या शिव्यांना घाबरून हीं पोरे आपणाला जवळही, करीत नाहींत, हें पाहून

तर त्याला बडोद्यांत एक क्षणभरसुद्धा राहूं नये असें वाटू लागलें. तो तासचे तास टिटऱ्या, काकड्या, रखमी आणि कचऱ्या यांच्याविषयींच्या आठवणी मनालाच सांगत शाळेच्या बागेंत फिरे. कुणी तरी आपणास अचानक हळूच उचलून जर मुंबईतील फॉकलंड रोडवर असलेल्या सिताराम बिल्डिंगजवळ नेऊन ठेवलें तर काय मजा होईल, असाही विचार त्याच्या मनात केव्हां केव्हा येई. पुष्कळदा बागेतून फिरता फिरता तो टिटऱ्या, काकड्या वगैरे पोराबरोबर आपण हसत खिदळत चाललो आहो, अशी कल्पना करून मनाशीच हसे अथवा काहींतरी गमतीचे बोले. नंतर आजूबाजूस पाहून फिरून खिन्न होई. पुष्कळदा बागेतील हिरवळीवर तो डोळे मिटून स्वस्थ पडे, तेव्हा त्याला आपल्या त्या जुन्या मंडळीपैकी कुणाची तरी शीळ ऐकू आल्याचा भास होई आणि मग तो देखील डोळे बंद असतानाच आपली दोन्ही हाताची दोन दोन चिमुकली बोटे एकत्र जुळवून तोंडात घाली आणि त्या कल्पनेतील शिट्टीला तसलीच शीळ घालून प्रत्युत्तर दिल्यासारखे करी. त्याला वर्ग चालू असेल तो वेळ मात्र बराच आवडे. त्या वेळात त्याचे मन वर्गातील अभ्यासात गुंतून राहिल्यामुळे त्याला मुंबईकर मित्रमंडळीची तितकी आठवण होत नसे. त्याला अभ्यास करायला आवडे. आपल्या पुस्तकातील चित्रे पाहात बसायला त्याला मौज वाटे. त्यातल्या त्या सोप्या पण गोड अर्थाने भरलेल्या कविताही तो पुष्कळदा गुणगुणत राही.

इतर मुलांच्या मानाने चंदू शिकायला हुशारच आहे, असे त्याच्या शिक्षकांना आढळून आले. पहिल्याच वर्षाच्या शेवटी त्याला त्याच्या वर्गातील पहिल्या नंबरचे बक्षीसही मिळाले होते.

केव्हा केव्हा त्याच्या हॉस्टेलमधील मुले शनिवारीं दुपारून 'पिक्‌निक्' ला जात. शहराबाहेरील ती मोकळी स्वच्छंदसृष्टि पाहून कसल्या तरी गोड संवेदना त्याला प्रफुल्ल करीत. ती हिरवी हिरवी शेती पाहून त्याला फार आनंद वाटे. तिकडून परत आल्यावर तो शाळेच्या

त्या सुदर बगीच्यांत फिरून खूप खूप विचार करी. कसला विचार करी, कुणाला माहीत. पण त्याच्या डोळ्यापुढे शहराबाहेरेची ती हिरवी गार शेती उभी राही आणि त्याला आपण तसल्या शेतातून खूप खूप फिरत आहों, अशीं जागृत स्वप्नें पडल्याचा भास होई.

त्याच्या शाळेंत शेतकी हा ऐच्छिक विषय ठेवलेला असे. चंदूला शेतकीमास्तरचा तास भारी आवडे. त्याची आणि शेतकीमास्तरची अगदीं गट्टी जमलेली होती. चंदूची शाळा शहराच्या एका कडेलाच एक मोठे पटागण होते त्याला लागून होती. केव्हां तरी त्या पटांगणाचे जर शेत केले, तर आपण त्यात कितीतरी आनंदानें काम करूं असे चंदूला वाटे. तो तासचे तास त्या पटांगणाकडे पाहात बसे.

महिन्याच्या शेवटीं जो शनिवार आणि रविवार येई, त्या शनिवारीं आणि रविवारी हॉस्टेलमधील कित्येक मुले आपल्या आईबापांच्या घरी जात. केव्हां केव्हां कित्येक मुलांचे आईबाप त्यांना भेटायला येत. अशा वेळीं चंदूला वाटे, कीं आपल्याला देखील आईबाप असते, तर आपण देखील असेच घरी गेलो असतो त्यांच्याबरोबर! हा विचार केव्हा केव्हां त्याला अगदीं अस्वस्थ करी. निदान आपल्या आईबापांची नांवे तरी आपणास माहीत असती तर बरें झाले असते असें त्याला मनांतून वाटे. शाळेत नांव घालतांना शेट हिराचदजीनीं त्याचें सबंध नांव "चंद्रकात दयाराम संकलेचा" असे सांगितलें होतें. शाळेंत सगळेजण त्याला त्याच नांवानें ओळखीत असत. शेठ दयाराम आपला कांहीं खरा बाप नव्हे. आपल्याला स्वतःचा खरा बाप कोण, ते का माहीत असूं नये ? हा प्रश्न चंदूला वारंवार अप्रिय वाटे.

'आई'या विषयावरील कविता गातांना त्याच्यापुढें एक प्रेमळ डोळ्यांची बाई हात पसरून उभी आहे असा भास त्याला होई आणि 'आई ऽ' अशी तोंड भरून हांक मारून आपण त्या बाईच्या गळ्यांत पडावें असें त्याला वाटे. केव्हां केव्हां तो एकटाच फिरत असला, म्हणजे या काल्पनिक आईबरोबर मोठमोठ्यानें बोलत असे. एखादे वेळीं तो

तिच्यावर रुसे आणि तिला म्हणे, "मला इतके दिवस एकटेंच सोडून गेलीस नाही का तूं? मी आतां नाही बोलणार जा तुझ्याशीं!" केव्हा केव्हा तो तिला म्हणे, "मी काय केल होतं ग तुझं, म्हणून तूं माझ्यावर अशी रागावलीस?"

वर्गांत मास्तर रागावले, तर तो लगेच आपल्या त्या कल्पनेंतील आईकडे एकान्तांत धाव घ्यायचा नि म्हणायचा, "आई, हे सगळे लोक रागावतात तेव्हा समोरासमोर येऊन रागावतात. मग तूं माझ्यावर तसंच कां ग नाहीस रागावत?"

केव्हा केव्हां चदू त्याच्या त्या कल्पनेंतील आईशी तसा बोलत असला, म्हणजे अचानक कुणी तरी तिकडे फिरत येई. त्याला चदूच्या त्या मनाशीच बडबडण्याचा अर्थ समजत नसे. कांही पोरांनी तर त्याला चक्रम म्हणूनही ठरवून टाकलें होते.

त्याच्या शाळेच्या मोठ्या हॉलमध्ये एका कुठल्या तरी प्रेमळ माणसाचा फोटो होता. या फोटोला केव्हा तरी एक माळ कुणी घालून ठेवली होती. चंदूला तो फोटो भारी आवडत असे. केव्हां केव्हा त्या फोटोकडे तो पाहातच राही किती तरी वेळ आपला बाप या फोटोंतील माणसासारखाच दिसत असेल काय, असा तर विचार त्याच्या मनात येत नव्हता ना?

रात्रींच्या वेळीं झोपण्याअगोदर सर्व मुलें प्रार्थना म्हणत. चंदूला प्रार्थनेची ती वेळ फार प्रिय वाटावयाची. प्रार्थना म्हणताना आपण ती प्रार्थना कुणासमोर म्हणतो, असे जर त्याला कुणी विचारलें असतें, तर चदू म्हणाला असता, "त्या आपल्या शाळेच्या हॉलमध्यें एक फोटो आहे ना? त्या फोटोसमोर. तो प्रेमळ गृहस्थ माझ्या समोर उभा आहे, असा भास मला होतो. देव माणसाच रूप घेतो हें जर खरं असेल, तर त्या फोटोंतल्या माणसाचं रूप घेण्याचा त्याला देखील मोह होईल, नाहीं का हो?"

आरंभीं आरंभी चंदूच्या शिव्या देण्यासारख्या वाईट संवयी पाहून शाळेचे अध्यापक बरेच अस्वस्थ होत. पण चदूचें मूळ काय, हें लक्षांत

आलें म्हणजे ते मनाशींच म्हणत, "गरीब पोरगा आहे, सुधारेल हळू हळू. अधिक लक्ष मात्र पुरवलें पाहिजे."

त्याच्या श्रमांचे चीज होत आहे असे त्याना दिसून येऊ लागलें.

चंदूच्या शिव्या देण्यासारख्या घाणेरड्या सवयी हळू हळू सुटत चालल्या, हें पाहून त्यांना पुष्कळच समाधान वाटे. त्याच्या अभ्यासांतही त्यानें चांगलेच मन घातले असल्यामुळें तो भराभर पास होत वरच्या वर्गांत जाऊ लागला. केव्हां केव्हा शेठ हिराचंद त्याची पूसतपास करीत, तेव्हां त्यानाही त्याची प्रगति ऐकून आनंद वाटे.

शेठ दयारामकडे त्याच्या अभ्यासाचा रिपोर्ट वारवार जाई, तो पाहून शेठजींना पुष्कळ समाधान वाटे. चदूला काहींच कमी पडूं नये अशी सर्व व्यवस्था त्यांनीं केलेली होती.

★

प्रकरण सातवे

# मुंबईची खबरबात

**चंदू** त्याच्या शाळेंत एक हुषार आणि गोड पोरगा म्हणून ओळखला जाऊं लागला. सर्वजण त्याच्याशीं अगदीं प्रेमानें वागत. मुंबईची आठवण त्याला आतां फार क्वचित होई. एखादे वेळीं तशी फार जोरानें आठवण आली, म्हणजे तो त्याच्या त्या मुंबईकर मित्रांना शेटजींच्या नावें एखादें पत्र टाकी. त्याच्या त्या पत्राचीं उत्तरेही केव्हां केव्हां येत ती उत्तरे वाचून चदूला मुंबईतील आपला तो जुना जीवनक्रम आठवे. त्याचें अगदीं पहिले पत्र गेले, तेव्हां टिटव्याने कोणाकडून तरी लिहून घेतलेलें पुढील अर्थाचे एक पत्र त्याला पाठवलें होतें—

"चंद्या, तुला जर बडोद्याला करमत नाहीं म्हणतोस, तर तूं मुंबईला निघून कां येत नाहींस एकदम ? तुला तिथं निजायला चांगली जागा नसली तर मग तूं मुळींच राहूं नकोस तिथं. आठवतं का मागं तुला कशी सर्दी झाली होती पावसामुळं ? ह्या वेळीं काहीं मी तिथं नाहीं आयशाबीकडून औषधपाणी पाठवून द्यायला ! सिताराम बिल्डिंग आता पार पाडून टाकली आहे. आम्ही, आयशाबी राहाते ना, तिथच त्या पत्र्याच्या चाळीच्या वळचणीला एक फक्कड निवारा शोधून काढला आहे. तुला तिथं सहज जागा होईल !

शेठजींनीं तुझ्यापुढच आम्हांला घेऊन दिलेले कपडे आम्हीं जुन्या बाजारांत विकून टाकले. पण रखमीच्या न् कचऱ्याच्या बापाला तें कळल्यावर त्यान त्या दोघांना बडव बडव बडवलं. पैसे मात्र आम्हीं त्या दारुड्याच्या हातीं लागूं दिले नाहींत.

चंदू, मला रखमी न् कचऱ्यावाणी बाप नाहीं तें चांगलं आहे पण जरी असता, तरी त्याची बी हड्डी नरम केली असती ह्या टिटव्यानं !

कपड्यांची ती चुगली काकड्याच्या भावानं रखमीच्या बापाला केली. सपाट्यांत गावला तर पाहून घेऊ.

काकड्या एका फळवाल्याच्या दुकानात शिरला; त्याला आयत्या वेळी पकडून त्या फळवाल्यान खूप ठोक दिला. आपल्या पोरांच्या टोळींत राहून त्याला फळं बी चोरायला येत नाहींत अजून नीट.

आम्ही तुझी वाट पाहून आहों. तू मुबईला निघून ये.

—टिटव्या."

हे पत्र आल्यावर कित्येक महिन्यांनीं टिटव्याचें आणखी एक पत्र आलें होतें. त्यात तो लिहीत होता—

"शेठजींच्या घरीं तुझी खुशाली विचारायला गेलो, तर ती ताराची 'मा' वसकन् अंगावर धावून आली न् म्हणाली, 'खबरदार, पुन्हा इकडे आलांत तर. तगडीच तोडून काढीन एकेकाची!' चंद्या, तंगडी तोडायला ह्यो टिटव्या तिला कोण वाटला असल र? काल शेठजींपासून तुझा पत्ता घेतला आणि हे नाटपेड तुला पाठवीत आहे. मला पत्र पाठवताना, भयरू पानवाला, ११ फाकलंड रोड, सातवी गल्ली ह्या पत्त्यावर पाठवीत जा."

ह्या पत्रातली भाषा अर्थातच वर दिली तशी नसे. पत्रेंही अगदीं त्याच वाक्यांचीं नसत. पण त्यांचें स्वरूप वरीलप्रमाणें असे. चंदूला हीं पत्रें आलीं म्हणजे अगदी आनंद व्हायचा. तो सबंध दिवस त्याला फार चांगला जात असे.

केव्हां केव्हां शेठ हिराचद त्याला आपल्या घरीं नेत, तेव्हां त्याला फार समाधान वाटे. जेव्हां आपल्याला या जगांत आपलें म्हणायला कोणी नाहीं ही जाणीव त्याला अस्वस्थ करी, तेव्हां त्याला ताराचीही आठवण होई आणि कां कुणास ठाऊक, त्याला फार समाधान वाटे. विषेशतः ताराची ती प्रेमळ वागणूक त्याला आठवे आणि त्याचा कंठ भरून येई. तो मनातल्या मनांत म्हणे, "तारा, तूं माझ्याशीं एकदांच प्रेमळपणानें वागलीस, पण माझ्या आयुष्यभर ती तुझ्या प्रेमळपणाची

स्मृति मला समाधान देत राहील. ताराची आठवण झाली, कीं आपण या जगांत अगदींच एकटे नाहीं असे त्याला वाटू लागे. वर्षांमागून वर्षें जात, तसतशी टिटव्या, काकड्या वगैरे पोरांची आठवण त्याला जुनी जुनी होत चालली, पण ताराच्या स्मृतीवर जुनेपणाची छाया देखील पडलेली नाहीं असें त्याला वाटे शेठ दयाराम त्याला केव्हां केव्हां एखाददुसरें पत्र लिहीत, त्यांत ताराचा उल्लेख आला म्हणजे तेव्हढाच भाग तो पुन्हा पुन्हा वाची. टिटव्याचींही पत्रें त्याला अधून मधून येतच असत, त्यांत तो त्यांचे उद्योग वगैरे गोष्टींविषयी सविस्तर लिहून कळवी. पण नंतर पुढें हीं पत्रे बरींच त्रोटक त्रोटक येऊं लागलीं. शेवटीं शेवटी तर वर्षांतून त्यानें दोन चार पत्रे पाठवलीं म्हणजेच टिटव्याचें एखादें पत्र आलें तर येई आणि ते देखील एखादें लहानसें पोस्टकार्ड असे. पुढें पुढें तर तें देखील येईनासे झाले. त्याच्या शेवटच्या पत्रांत त्यानें लिहिले होतें—

"चंद्या, रखमी फार आजारी आहे. तिला दवाखान्यांत जायला नि दवा घ्यायला पैसे पाहिजेत. सरकारी दवाखान्यांत फुकट जातां येईल, पण तिथं चांगली व्यवस्था होत नाही. नर्सा नि डाक्टरलोक राग राग करतात."

हें पत्र आल्यावर चंदूनें आपल्याजवळच्या पैशांतून काहीं पैसे टिटव्याच्या नांवावर पाठवून दिले, पण ते पैसे टिटव्याला मिळाले नाहींत. 'मालक सांपडत नाहीं.' असा शेरा घेऊन मनीऑर्डर परत आली. त्यावर तीन चार पत्रें चंदूनें टिटव्याला त्यानें दिलेल्या पत्त्यावर पाठवलीं, पण तीं सगळीं पत्रें त्याच्याकडे परत आलीं. त्यानें शेठ दयारामना देखील लिहून पाहिलें. पण शेठजींचें पत्र आलें त्यांत त्यांनीं लिहिलें होतें, कीं "टिटव्या अगर त्याची मंडळी कोठें गेलीं तें मला माहीत नाहीं. कांहीं महिन्यांपासून ती मला दिसलींच नाहींत." अशा रीतीनें निराश होऊन टिटव्याच्या शोधाचा नाद चंदूला सोडून द्यावा लागला होता. केव्हां तरी आपण परत मुंबईला जाऊं, तेव्हां आपली ती

जुनी मित्रमडळी आपण शोधून काढूं असें त्यानें मनाशीच ठरवले होतें. मुंबईस गेल्यावर आपल्याला त्यांचा शोध सहज लावता येईल असे त्याला वाटत होतें.

चदू जसजसा मोठा होऊ लागला तसतसा अधिकच सुदर दिसू लागला होता. मूर्तिमंत तारुण्य त्याच्या नसानसात खेळत होतें. त्याची ती भरदार शरीरयष्टी पाहून पाहाणारा समाधानानें "वा रे तरुण!" असे उद्गार काढल्याखेरीज राहात नसे. शाळेतील अभ्यासात जसा चंदू प्रवीण, तसाच खेळात देखील पटाईत होता. त्याच्या शाळेचा चॅम्पियन म्हणून फार लौकर तो प्रसिद्धीला आला मॅट्रिकची परीक्षा पास झाला, तेव्हा सर्व शाळेतर्फे त्याला निरोप देण्याचा समारभ झाला. एक हुषार विद्यार्थी आणि शाळेचा चॅम्पियन म्हणून पुष्कळांनी त्याचा गौरव केला. फुलांच्या माळानी त्याचा गळा भरून गेला होता आणि आपल्या गौरवाची भाषणें ऐकून त्याचा ऊर दाटून आला होता.

★

प्रकरण आठवे

# ताराची पुनर्भेट

**कॉलेजच्या** दुसऱ्या वर्गात चंदू असतांना शेठ दयाराम आणि तारा बडोद्याला कामानिमित्ताने आलीं होती. शेठजीनी चंदूची चौकशी केली, तेव्हां शेठ हिराचंद यांनी जी माहिती त्याना दिली ती ऐकून त्यांना फार आनद झाला. तारा आता पुष्कळच मोठी दिसत होती. एकेकाळीं आपणांस याच मुलाने मरणाच्या दाढेतून ओढून काढलें वगैरे हकीगत तिला ऐकून माहीत होती. चंदूला जरी तिनें प्रत्यक्ष पाहिलेलें होते, तरी त्याचा चेहरा आता तिला बिलकूल आठवत नव्हता. त्या प्रसगाची कांही तरी विचित्र आठवण तिच्या मनात होती. तिला आठवत तर होते पण काय आठवत होते तेंच समजत नव्हतें.

शेठ दयारामनी जेव्हा चदूला भेटण्याची गोष्ट काढली, तेव्हा ताराला बरें वाटले. बाहेर जाण्यासाठी तयार होऊन ती शेठजीबरोबर चदूच्या राहाण्याच्या ठिकाणाकडे निघाली.

चंदूचें कॉलेज कांहीं फार दूर नव्हतें. शेठ दयाराम, शेठ हिराचद आणि तारा ताबडतोब तेथे पोचली. कॉलेजच्या क्रीडांगणावर क्रिकेटची मॅच चालू होती. “चंदूचा खेळ आज तुम्हांला बघायला मिळेल” असें शेठ हिराचद म्हणाले, तेव्हां तर ताराची उत्सुकता कमालीची वाढली.

ते ग्राउंडवर जाऊन पोंचले, तेव्हां मॅच अगदीं रंगांत आली होती. प्रिन्सिपलनीं शेठ हिराचंद आणि त्यांची पाहुणेमंडळी यांचें प्रेमानें स्वागत करून त्यांना प्रेक्षकमंडळींत एका चांगल्या जागीं नेऊन बसविले. शेठ हिराचंद यांनीं आपल्या पाहुण्यांची ओळख करून दिल्यावर चंदूच्या कॉलेजचे प्रिन्सिपल चंदूची एक एक गोष्ट अभिमानानें सांगूं लागले.

" तो पाहा तुमचा चंदू, " बॅटिंग करणाऱ्या एका सशक्त आणि उमद्या तरुणाकडे बोट दाखवून ते म्हणाले. " आमच्या कॉलेजचा तो हीरो आहे हीरो ! शाबास पठ्ठे ऽऽ ! " चंदूनें एक बाऊंडरी मारलेली पाहून ते ओरडले. तारा आश्चर्यानें आणि कौतुकाने त्या उमद्या तरुणाचा खेळ पाहात बसली होती. चंदूने आणखी एक सणसणीत टोला लगावला ते पाहून तिने जोरानें टाळ्या वाजवल्या.

त्या दिवशी चदूचा खेळ कांहीं औरच झाला. इकडे त्याचे प्रिन्सिपल त्याच्या इतर कित्येक गोष्टी अभिमानाने सांगतच होते. शेठ दयारामही अगदी खूष झाले. शंभर धावा काढून चंदू तंबूकडे येण्यास निघाला, तेव्हा त्याच्या नावाच्या जयजयकारानें क्रीडांगण दुमदुमून गेलें. त्याच्या कॉलेजचे विद्यार्थी त्याला खाद्यावर उचलून घेऊन तंबूंत नाचत बागडत आले. त्याच्यावर अभिनदनाचा अगदीं वर्षाव झाला. त्याच्या कॉलेजच्या विद्यार्थिनी आणि विद्यार्थी यांच्या गर्दींत तो कुठें नाहींसा झाला, ते देखील दिसेना. ताराला काय आनंद झाला तें सारें पाहून ! आपण देखील जाऊन त्याचे आभिनदन करावें असें तिला वाटूं लागलें.

चदूचे अभिनंदन करण्यासाठीं प्रिन्सिपल पुढे झाले. त्यांनीं त्याचें मनापासून अभिनदन करून, तुम्हाला मुंबईहून कोणी तरी भेटायला आले आहे, तिकडे चला असें चंदूला सांगितलें.

गर्दींतून वाट काढीत चंदू व प्रिन्सिपल शेठ हिराचंदच्या पाहुण्यांकडे आले आणि त्यांनीं चंदूची आणि त्या पाहुणेमंडळीची प्रत्यक्ष भेट करून दिली. शेठजींनी चंदूचा हात प्रेमभरानें कितीतरी वेळ तसाच हातांत धरून ठेवला होता. तारानें आपलें अभिनंदन त्याला गोड हास्याच्या रूपानें कळवलें. त्या संध्याकाळीं शेठ हिराचंदच्या घरीं त्यांच्या त्या मुंबईकर पाहुणेमडळीबरोबर चंदूही गेला.

भोजनोत्तर गप्पागोष्टींत बोलतां बोलतां ताराचा व चदूचा संकोच बराच नाहींसा झाला. तीं पुष्कळच मोकळ्या मनानें बोलूं चालूं लागलीं.

शेठ दयाराम तर चंदूला प्रत्यक्ष पाहून अगदी निहायत खूष झाले होते. त्यांनीं चंदूचे शिकून निघाल्यानतरचे काय बेत आहेत त्याची चौकशी केली. तेव्हां चंदूने त्याना उत्तर दिलें,

"शेठजी, मी बडोद्याला आलों तेव्हा माझ्या मुबईतील मित्रमडळीला असें वचन दिले होते, की त्यांच्यासाठी काही तरी करीन. त्यांची सेवा करून त्यांच्यांत कांही तरी सुधारणा घडवून आणावी म्हणून मी माझे आयुष्य खर्चीन." चदूचे ते उत्तर ऐकून व त्याला पूर्वीची त्याची मित्रमंडळी अजूनही तितकीच प्रिय वाटते हे पाहून शेठ दयाराम तर अधिकच खूष झाले. त्यानी चदूला त्याच्या त्या विचाराबद्दल धन्यवाद देऊन म्हटले,

"तुझे शिक्षण सपले, कीं तू मुबईस ये. तुझ्यासाठीं कामाची वगैरे सोय मी करीन. मला तू आगाऊ लिहून मग ये म्हणजे झाले."

शेठ दयारामच्या त्या बोलण्याने चदू उपकाराच्या ओझ्याखालीं दबल्यासारखा झाला. त्याच्या कंठांतून शब्दही निघेना. तो शेठजींना इतकेंच म्हणाला,

"शेठजी, तुम्हीं माझ्या शिरावर उपकारांची रास केली आहे. तुमचें ऋण मला केव्हाही फेडतां येणार नाहीं! जगांत केव्हां केव्हां एखाद्याचें सदैव ऋणी राहाण्यांतच धन्यता असते!"

चदूचें ते आभारप्रदर्शन ऐकून शेठजींचा कंठही भरून आला. ते चंदूला म्हणाले,

"चदू, तूं माझ्यावर एव्हढा मोठा उपकार केला आहेस, कीं त्या मानानें मीं तुझ्यासाठीं जें केलें, तें अगदीं योग्य केलें असें मला वाटतें. त्याच्यासाठीं माझे आभार मानण्याची तसदी तूं घेतली नाहींस तरी चालेल."

शेठ दयाराम आणि तारा यांचा मुक्काम चार पांच दिवस होता. शेठ दयाराम यांना त्यानंतर चंदूला भेटून त्याच्याशीं बोलण्या बसण्याला वेळ मिळाला नाहीं. कामांतच त्यांचा सर्व वेळ गेला. ताराला मात्र

पुष्कळ वेळ होता. सायंकाळच्या वेळी चंदूबरोबर फिरून आपल्या मुंबईतील गोष्टी त्याला सांगणे आणि त्याच्या कॉलेजच्या गमती ऐकणे तिला फार आवडे.

त्यांच्या त्या चार दिवसाच्या सहवासात ताराविषयी चदूला पुष्कळच आदर वाटू लागला होता. लहानपणी जशी ती प्रेमळ आणि मनमिळाऊ होती, तशीच, किंबहुना त्याहूनही अधिक प्रेमळ आणि गोड स्वभावाची ती आता झाली होती. मुंबईस ती इंग्रजी सहावीत शिकत होती. तिच्या वयाच्या मानाने तिचे शिक्षण फार चांगले झाले होते. शाळेंत तिचा अभ्यासक्रम अगदी उत्तम प्रकारचा असून ती सगळ्या शाळेची आवडती होती. चदूचें व तिचे जे संभाषण होई, त्यावरून तिचा समंजसपणा आणि गोड स्वभाव चंदूला चागलाच कळून आला होता; उलट चंदूविषयीं तारालाही फार आदर वाटूं लागला होता. त्याच्याबरोबर गप्पागोष्टी करण्यांत तिला फार समाधान वाटत असे. परत मुंबईला जाण्याचा दिवस जवळ आला, तेव्हां तर तिला असेंही वाटलें, की तो दिवस आणखी जरा लांबणीवर पडला तर बरें होईल !

ज्या दिवशी तारा परत मुंबईला जाणार होती, त्याच्या आदल्या सध्याकाळीं चंदूबरोबर बोलतां बोलतां ती त्याला म्हणाली,

"चदू, आता आपली फिरून केव्हां भेट होईल कुणास ठाऊक. बडोद्यांतले हे चार दिवस इतके आनंदांत गेले, कीं विचारूं नकोस. मला तूं मृत्यूच्या दाढेंतून ओढून काढलं नसतंस तर आज आपली भेटसुद्धां झाली नसती—"

"अन् मग मी कुठं असतों !" चंदू म्हणाला, "तारा, तुझ्या दयाळू पित्यानं माझ्या एका क्षुल्लक कामगिरीमुळें मला माणूस बनवलं. तुमचे उपकार मी जन्मभर फेडू शकणार नाहीं !"

"माझा जीव तूं वांचवलास म्हणून बापजींनीं तुझ्यासाठीं कांहीं तरी केलं असेल" तारा म्हणाली, "पण स्वतः मी अजून तुझ्यासाठीं कांहीं

केलेलं नाहीं. खरं पाहिलं, तर बापजींपेक्षां माझ्यावरच तुझे अधिक उपकार झाले आहेत."

ताराचे ते बोलणें चालू असता चंदूला तो चिरस्मरणीय दिवस आठवला. तो शेठजींच्या घरी बिछान्यावर पडला होता आणि सुमारे पांच वर्षे वयाची ती गोड पोरगी तारा त्याच्या बिछान्यावर बसून बोबडे बोल बोलून त्याच्या केसावरून आपला इवलासा हात फिरवीत बसली होती. तितक्यात तिची आई आली आणि छोट्या ताराला एका भिकाऱ्याच्या पोराबरोबर खेळतांना पाहून तिच्या संतापाला सीमा राहिली नाहीं. ती मथुराबाईला रागें भरूं लागली आणि ताराला तेथून उचलण्यास सांगूं लागली. बिचारी तारा मोठमोठ्याने रडून आपली नापसंती दाखवू लागली, पण तिला बाहेर जावेंच लागले. जाता जातां तिनें आपल्या इवल्याशा हातांनी चंदूचें तोंड कुरवाळून त्याच्या सबंध आयुष्यांत जिव्हाळ्याचा ओलावा निर्माण केला.

चदूला तो सर्व प्रसंग आठवला आणि तो ताराचे भाषण मध्येंच थांबवून म्हणाला,

"तुला आठवत किंवा नाहीं कुणास ठाऊक तारा, पण तूं माझ्यासाठीं अशी एक गोष्ट केलीस, की त्या गोष्टीमुळंच मला जगण्यांत गोडी वाटते. मी या जगात एकटा नाहीं असं मला तुझ्या त्या प्रेमळ हस्तस्पर्शानं पटवून दिलं. माझ्याही जीवनांत कुणाचा तरी जिव्हाळा असून तें अगदींच रखरखीत आणि वैराण नाही हें तूंच मला अनुभवायला लावलं आहेस."

चंदू हें सर्व बोलून गेला खरा, पण आपण बोलूं नये तें तर बोलून गेलों नाहीं ना असें त्याला वाटायला लागलें. त्यानें कांहीसे भीत भीतच ताराकडे पाहिलें. तारा खालीं पाहात चालली होती. तिला कांहीं तरी बोलावेंसें वाटत होतें, पण ती ते शेवटपर्यंत बोललीच नाहीं.

शेठ हिराचंदच्या घरापर्यंत चंदूनें तिला आणून सोडल्यावर तो म्हणाला,

" तारा, मी कदाचित् आज बोलूं नये ते देखील बोललों कीं काय कुणास ठाऊक. तुला दु ख होईल असा एखादा शब्द जर चुकून माझ्या तोंडांतून गेला असला, तर त्याबद्दल. तूं मला क्षमा कर. मला हें सारं कुठ तरी बोलून टाकायला पाहिजे होतं, तें मीं आज तुझ्याजवळ बोलून टाकल."

तारानें फिरून काही तरी बोलण्याचा प्रयत्न केला, पण तिच्या तोंडातून शब्दच बाहेर पडेनात. ती चंदूचा निरोप घेऊन शेठ हिराचंदच्या बंगलीच्या पायऱ्या चढून वर गेली.

दुसऱ्या दिवशीं चंदू शेठजीना आणि ताराला पोंचवायला स्टेशनवर गेला. पण या वेळीही तारा त्याच्याशीं फारसे कांही बोलली नाहीं. मात्र गाडी स्टेशन सोडून दूर गेली तरी ती खिडकीबाहेर डोकावून त्या स्टेशनच्या दिशेनें मागें पाहात होती.

★

प्रकरण नववें

# चंदू परत आला

**शेठ** दयाराम यांनी चदूला मुबईस जातांना सागितल्याप्रमाणें त्यांनीं देऊं केलेली नोकरी स्वीकारावी म्हणून पदवीधर चदू मुबईस यायला निघाला रस्त्यानें कितीतरी प्रकारच्या विचारांची खळबळ त्याच्या हृदयात माजून राहिली होती ! आज इतक्या वर्षानी तो मुबईस परत चालला होता या वर्षात कितीतरी घडामोडी झाल्या असतील ! शेठजी आणि तारा त्याला भेटून गेल्याला तीन चार वर्षे होऊन गेली होती. जातांना तारा आपल्याशी काही विशेष बोलली नव्हती. आपण तिचा अपमान होईल अशा प्रकारचे तर कांही बोललो नाही ना, या भीतीने नतर एक पत्र पाठवून ताराची आपण क्षमा मागितली होती आणि तें पत्र गेल्यावर पांच सहा दिवसांनीच तारानेही आपल्याला एक पत्र पाठविले, त्यांत तिनें लिहिलें होते,

" माझा अपमान होईल अस तू काय बोललास, तेंच मला कळत नाहीं. माझी तूं क्षमा मागावी असं कांहीसुद्धां तुझ्याकडून झालेलं नाहीं उलट चंदू, तुझ्याबरोबर घालविलेले ते चार दिवस इतके मजेंत गेले, की तितके मजेचे दिवस मला कुठलेही वाटले नव्हते. तूं शिक्षण संपवून परत मुंबईला आलास म्हणजे कदाचित् तसे दिवस पुन्हा लाभतील अस वाटतं. लौकर लौकर शिकून परत ये—"

या पत्रानंतर अशींच आणखीं कांहीं पत्रें तारानें आपणास पाठविली. त्या सर्व पत्रांत तिचा प्रेमळपणा कसा अगदीं मूर्तिमंत उतरलेला दिसे. आपण तीं सारीं पत्रें अगदीं जिवापलीकडे जपून ठेवलीं आहेत हें चंदूला माहीत होतें. त्यानें आपली सूटकेस उघडून तिच्यांत एके ठिकाणीं जपून ठेवलेलीं ती सारी पत्रें बाहेर काढलीं आणि पुन्हा

एकदा तीं वाचून पाहिली. ताराचीं पत्रे नंतर नंतर उशीरां येऊं लागलीं होतीं. हळू हळू ती देखील बंद झालीं. तीं जुनी पत्रें चाळतां चाळतां एका पत्रातील पुढील ओळी त्याने पुन्हा पुन्हा वाचून कांढल्या. त्यात तारानें लिहिले होते,

" तूं परत येशील तेव्हा मला एक पत्र घाल. मी तुला उतरून घ्यायला स्टेशनवर येईन. "

आज चदू मुंबईस चालला होता, पण त्यानें ताराला पत्र घातलें नव्हते. ताराच्या त्या पत्रावरची तारीख चंदूने पाहिली. सुमारें दीड वर्षापूर्वी ते तिने त्याला लिहिले होते. तेच तिचे शेवटचे पत्र. त्यानतर त्याला तिच्याकडून पत्र आलें नव्हते. आज अचानक तो तिच्यापुढें जाऊन उभा राहाणार होता. आपणांस असे अचानक समोर उभे पाहून ताराला काय वाटेल असा एक ओझरता विचार त्याच्या डोक्यात आला आणि तो मनाशीच हसला. का हसला कुणास माहीत. शेठ दयारामना त्याने एक पत्र पाठवून आपण कोणत्या गाडीने येणार तें कळविले होते. त्यानीं ते पत्र ताराला दाखविले असेल काय ?

गाडी धाड् धाड् आवाज करीत स्टेशनात शिरली. चंदूने सर्व प्लॅटफॉर्मवर नजर फिरविली. कोणीही स्टेशनवर आले नव्हतें. एक हमाल करून त्याने त्याच्या जवळ आपले सामान दिलें आणि तो प्लॅटफॉर्मवरून बाहेर जाण्यासाठी झपाट्याने चालला. त्याच्या अगदीं बालपणची आठवण झाली त्याला. तो बडोद्याला जातांना ज्या ठिकाणीं टिटव्या, काकड्या, रखमी आणि कचऱ्या उभे होते त्या जागीं त्याचें लक्ष गेलें. पुन्हा एकदा त्याला तें सगळें दृश्य आठवले. "खरंच, कुठं असतील तीं पोरं ? आता ती सारीं मोठाली झालीं असतील. रखमी पोरगी नाकीं डोळी अगदीं नीटस होती. ती आतां कशी दिसत असेल ? बस, बस. आतां गेल्याबरोबर प्रथम शेठजींकडे जाऊन सामान सुमान ठेवायचें आणि त्या आपल्या पोरांना शोधून काढायचे. आपल्याला इतका मोठा झालेला पाहून ते ओळखतील कीं नाहीं कुणास ठाऊक. त्याना आपण

इतक्या दिवसांनीं भेटल्यावर काय वाटेल? टिटव्या काय म्हणेल? काकड्या आणि कचऱ्याला काय वाटेल? रखमी आपल्याला ओळखील का?" असे एक नि हजार विचार त्याच्या मनात घोळत होते. त्याने एक व्हिक्टोरिया ठरविली आणि तिच्यात बसून तो चर्नीरोडकडे निघाला.

शेठजींची ती इमारत दिसताच कांहीं तरी विशेष आनदाची एक लाट त्याच्या सर्व शरीरांत चमकून गेली. दादर चढून तो वर गेला. शेठजींच्या घराचे दार बंद होते. त्यानें हळूच टिक् टिक् असा आवाज करून तें ठोकलें. दार उघडलें गेलें. तिरसट मुद्रा धारण केलेली ताराची 'मा' दारात उभी होती.

"कोण पाहिजे?" तिनें कडवट आवाजाने प्रश्न विचारला.

"मी चदू. तुम्ही मला ओळखल नसेल! मी इथून गेलों, तेव्हा अगदीं लहान होतो. त्या वेळी तुम्ही मला पाहिलं होतं—"

"चंदू काय?" ताराची 'मा' काहींसे स्वतःशीच म्हणाली. चंदू येणार हें तिला माहीत होते. शेठजींनीं ते तिला सागितले, तेव्हां तिची नि शेठजींची थोडीशी खडाजंगीही झाली होती; त्यावर चंदू आल्यावर त्याचें कसें काय स्वागत करायचे याचाही थोडासा आराखडा तिने मनातल्या मनात आखून ठेवला होता. पण प्रत्यक्ष चंदूला पाहून मात्र तिचे ते सारे बेत कुठेच्या कुठेच नाहीसे झाले असावेत. तिनें कांही न बोलतां दारांतून बाजूला होऊन रस्ता मोकळा केला आणि चंदूला आंत येण्याचीही खूण केली. चंदूने सामान वगैरे ठेवणाऱ्या भय्याला पैसे देऊन वाटेस लावले आणि औपचारिक रीतीने कांहीं तरी बोलायला तो ताराच्या 'मा' कडे वळणार, इतक्यात तारा आणि शेठजीच बाहेरून आत आले. चदूला आपल्याही अगोदर घरीं आलेला पाहून त्या दोघांनाही आनंद झाला आणि आश्चर्यही वाटलें. तारा तर म्हणाली,

"वा तुम्ही बडोदेकर! बरेच चोर पावलाचे आहांत कीं! आम्ही स्टेशनवर आलों तरी आम्हांला न भेटतांच घरींही आलांत."



" वा तुम्ही बडोदेकर ! बरेच चोर पावलाचे आहात की "

[ पृष्ठ ५२

" मला तर वाटलं, कीं तुझी गाडीच चुकली." शेठजी म्हणाले. त्याच वेळीं ताराच्या 'मा' नें असें कांहीं पाहिलें, कीं 'ती गाडी चुकली का नाहीं कुणास ठाउक!' असेंच तिला म्हणायचें होतें, असें कुणालाही वाटलें असतें. चंदूच्या तें लक्षांत आलें नाहीं म्हणून बरें झालें, नाहीं तर त्याला त्यामुळें खात्रीनें वाईट वाटलें असतें.

ताराची 'मा' त्यानतर तेथून फणकाऱ्यानेंच निघाली आणि आंतल्या बाजूला जाऊन कुणावर तरी खूप संतापून ओरडू लागली. खुद्द शेठजीच त्या बाजूला गेले, तेव्हां तिचें तें ओरडणें बंद झालें. ताराच्या 'मा' कडून शेठजी परत आले, तेव्हा त्यांचा चेहरा बराच उतरला आहे असें जरा बारकाईनें पाहाणाराच्या तेव्हांच लक्षांत आलें असतें. स्वतः त्यानीं मात्र विशेष काहींच नाही असें दाखविण्याची फोल धडपड चालविली होती. ते आंत आल्यावर चदूला म्हणाले, "आंघोळ वगैरे करून घे तूं, म्हणजे जेवण वगैरे झाल्यावर मी तुला तुझी खोली दाखवायला घेऊन जातों. इथून कांहीं फार लांब नाहीं. दोन तीन बिल्डिंग टाकून चौथी कीं पांचवी बिल्डिंग आहे. हवा वगैरे छान येते. तुझ्या खोलींत सामान वगैरे मीं तयार ठेवलें आहे सारें कांहीं."

शेठजींच्या चंदूवरील प्रेमाला जोड नव्हती. चंदूला तें प्रेम अगदीं पूर्णपणें समजलें होतें. त्याच्या तोंडातून हुंदकाच बाहेर पडणार होता, पण तो शेटजींना दिसूं नये म्हणून तो घाईघाईनें न्हाणीघरांत गेला.

जेवून शेठजी आणि चदू चंदूच्या नवीन खोलीकडे निघाले. सोबत ताराही होतीच. आंतल्या खोलींतून ताराची 'मा' कांहींतरी बडबडत होती. घराबाहेर पडून शेठजी, चदू आणि तारा चंदूच्या त्या नव्या बिऱ्हाडात आलीं. खोली एकट्या माणसाला पुरेल इतकी मोठी होती. सामान सुमान खाटेपासून तें केरसुणीपर्यंत सगळें जिथल्या तिथें होतें. चंदूचे डोळे अश्रूंनीं भरून आले.

" शेटजीं, तुमचे आभार मी कसे आणि किती मानूं ?" तो कसें तरी म्हणाला.

"पोरा, मीं जें कांहीं केलं, त्याला तूं अगदीं योग्य आहेस अशी माझी खात्री आहे. जशी माझी तारा तसाच मी तुलाही समजत आलों. तूं नसतास तर तारा देखील नसती."

"शेठजी, एक लहानशी गोष्ट मीं तुमच्यासाठीं केली, एवढ्याचवरून तुम्हीं माझा पुत्राप्रमाणें सांभाळ केलात. मला शिक्षण देऊन लायक केलेंत आणि आतां कामाला लावून तुम्ही मला रांगेला लावणार! आतांपर्यंत पुष्कळ उपकारांचें ओझें तुम्ही माझ्यावर केले आहे. यापुढें मी माझें पाहाण्यास तुमच्या कृपेने समर्थ झालों आहे." चंदू डोळ्यांत पाणी आणून म्हणाला.

शेठजींनीं त्याला पोटाशी धरून म्हटलें, "मला म्हाताऱ्यालाही आतां हें सारें पाहून किती आनंद होत आहे तें तुला समजायचं नाहीं. मी तुला मुलाच्या ठिकाणींच समजतों. आपल्या मुलाला स्वतःच्या पायांवर उभा राहातांना पाहून कुठल्या बापाला संतोष झाल्याशिवाय राहील!"

त्या दोघांना तशा स्थितींत पाहून ताराच्याही डोळ्यांत अश्रु भरले. त्या तिघांच्या अश्रुपूर्ण नेत्राना पाहून जणूं काय तीन नद्यांचा संगमच झाला आहे असेंच कुणालाही वाटलें असते.

★

प्रकरण दहावें

## ताराच्या ‘ मा ’ चें म्हणणें

**कामाचा** पहिला दिवस सपवून साडेपाचच्या सुमारास चंदू आपल्या खोलीकडे आला. हातपाय धुऊन त्यानें ताराबरोबर फिरायला जाण्याची तयारी केली. शेठजींच्या घराकडे तो गेला, तेव्हां दार उघडायला ताराच येईल असें त्याला वाटलें होतें. पण दार उघडायला तारा आली नाहीं. आतल्या बाजूला कांहीं तरी काम सांगून ताराच्या ‘मा’ नें तिला सारखे डाबून ठेवले होतें आणि आपण स्वत: चदूची वाट पाहाण्यासाठीं ती समोरच्या भागी बसली होती. चंदूनें दारावर टिक् टिक् करतांच तिनें दार उघडले. तिच्या नजरेंत या वेळीं मूर्तिमंत संताप भरून राहिला होता. दारात चंदूला पाहून तिनें त्याला तिच्या नेहमींच्या कडवट आवाजानें प्रश्न केला.

“ कोण पाह्यजे तुम्हाला ? ”

“ मी ताराला भेटायला आलो आहें. दुपारीं तिनं मला या वेळीं येण्यास सांगितल होतं. आज आम्ही चौपाटीवर फिरायला जाणार आहोंत. ”

चंदूचें तें सरळ आणि स्पष्ट उत्तर ऐकून ताराची ‘मा’ अधिकच क्रुद्ध दिसूं लागली.

“ तारा तर गेली बाहेर. तिनं मला तुमच्या फिरायला जाण्याविषयीं कांहीं सांगितलं नाहीं.” ताराची ‘मा’ आपला संताप गिळून टाकण्याचा फोल प्रयत्न करीत म्हणाली, “ ती आतां लौकर परत येणार नाहीं. तसं ती जातांना म्हणाली होती. ”

“ माझ्या खोलीकडे तर नाहीं ना गेली ती ? ” चंदूनें शंका काढली.

"मला नाहीं तसं वाटत." ताराची 'मा' म्हणाली, "ती बहुतेक रमणलालशेटजींच्या घरीं गेली असेल. तुम्हाला उगीच हेलपाटा पडला."

चंदू निराश झाला. तो म्हणाला, "बरं आहे. मी आलों होतों म्हणून तुम्ही सांगाल का ताराला ?" जाण्यासाठीं वळत तो म्हणाला. ताराची 'मा' उत्तरादाखल जरा कठोर आवाजानेच म्हणाली,

"मला वाटतं, कीं तुम्हाला आजच काय ते स्पष्ट शब्दात सागावं." जाण्यासाठीं वळलेला चदू जागच्या जागीच थाबून ताराच्या 'मा' कडे प्रश्नांकित मुद्रेनें पाहूं लागला. ताराची 'मा' काहींच बोलली नाहीं. तिनें आपल्यामागून येण्याविषयीं चंदूला खूण केली. चदू तिच्या मागून शेजारच्या एका खोलीत गेला ताराची 'मा' तेथील एका खुर्चीवर बसली आणि चदूला दुसऱ्या खुर्चीकडे बोट दाखवून तिनें बसण्याची खूण केली.

"तुम्हाला कदाचित् फार वाईट वाटेल, पण मला आज हे सागितलंच पाहिजे असं वाटत.' ती चंदूला म्हणाली, "तुम्ही नेहमीं नेहमीं आमच्या घरीं येण्याची तसदी घेऊं नये. ताराला तुमच्याबरोबर फिरायला वगैरे येता येणार नाहीं तुमच्यासारख्याना वास्तविक या गोष्टी अशा स्पष्ट सांगायचीही गरज नव्हती. तुम्हीं स्वतःची पायरी ओळखूनच राहायला पाहिजे होतं...."

ताराच्या 'मा' चें तें सारें बोलणें चंदूनें शांतपणानें ऐकून घेतलें. त्या बोलण्यातील प्रत्येक शब्दागणिक त्याच्या मनाला दुःसह वेदना झाल्या. पण ताराच्या 'मा' चा त्याला तरीही राग आला नाही. 'आपण यःकश्चित् भिकारी असताना ताराच्या प्रेमळ पित्यानें आपणावर दया केली आणि आपण आज असे माणसात आलों' हें तो विसरला नव्हता. त्याला ताराच्या 'मा' चा थोडासुद्धा राग आला नाहीं तो याच गोष्टीमुळें. आपणावर उपकार करणाऱ्या महात्म्याच्या पत्नीला आपण आपल्या वागण्यामुळें दुःख दिलें असें त्याच्या मनानें घेतलें त्यानें गुन्हेगार माणसाप्रमाणें खाली मान घालून ताराच्या 'मा'ला म्हटल,

"तुमचे माझ्यावर कल्पनातीत उपकार झाले आहेत. अतःपर तुम्हांला वाईट वाटूं नये म्हणून मी या घराचा उंबराही चढणार नाहीं. ताराविषयीही काळजी करूं नका. मी तिच्या इभ्रतीला बाध येईल अशा प्रकारें येथून पुढे केव्हांही वागणार नाहीं." शेवटचें वाक्य म्हणतांना चंदूच्या हृदयात जी कालवाकालव चाललेली होती तिचा कळस झाला. तरी पण तो जे काहीं बोलला तें इतकें निश्चयपूर्वक बोलला, कीं बोलल्याप्रमाणेंच तो वागेल अशी ताराच्या 'मा'ची खात्री झाली. तिनें एकवार समाधानाने श्वास सोडून चदूला म्हटले, "माझी खात्री होती, कीं तुम्ही असे समजस असाल. मी जें काहीं बोललें ते केवळ ताराच्या हिताच्या दृष्टीनेच बोलले."

त्यानतर जड अंत.करणानें चदू तेथून उठून बाहेर आला. त्याच्या हातापायातली सगळी शक्ति जणू काय नाहींशी झाल्याप्रमाणे त्याला वाटूं लागलें. तो मधल्या दिवाणखान्यात यायला आणि तारा समोरून यायला एकच गाठ पडली.

"चदू, आलास देखील तू! थाव हं, मी आतां तयार होऊन आलें."

चंदूच्या हृदयात जी खळबळ माजली तिचे ततोतंत वर्णन करणेंच शक्य नाहीं. त्याला वाटलें, कीं असल्या प्रकारची वेळ वैऱ्यावरही येऊं नये. एकाच मिनिटापूर्वी त्याचें व ताराच्या 'मा' चें जें सभाषण झालें, त्यातलीं काहीं वाक्ये जणू काय पुन्हा त्याच्या कानाशीं कोणी उच्चारीत आहे असें त्याला वाटू लागले. "तुम्हीं आपली पायरी ओळखून राहायला हवें होतें," ताराची 'मा'म्हणाली होती. तारासारख्या भाग्यवान् मुलीशी मैत्री ठेवण्याची आपली पात्रताच नाहीं अशी त्याची खात्री झाली. ताराच्या नजरेला नजर भिडविण्याचा धीर त्याला झाला नाहीं. तो खालीं मान घालून म्हणाला,

"तारा, मला आज फिरायला येता येत नाहीं. रागावूं नकोस अं माझ्यावर, आज मीं तुझी निराशा केली."

"कां रे ? काय दुखतंय बिखतंय कीं काय तुझं ?"

चंदूनें त्यावर काहीं तरी बोलण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या तोंडांतून एक देखील शब्द बाहेर पडला नाहीं. ताराच पुढें म्हणाली,

"दुखत बिखत असलं तर जा, जाऊन पड जरा. कदाचित् कामाचा पहिलाच दिवस असल्यामुळं तसं वाटत असेल तुला."

चंदूला एव्हढें कारण बरें मिळाले. तो ताराचा कसा तरी निरोप घेऊन बाहेर पडला आणि आपल्या खोलीत येऊन बिछान्यावर पडला. आतां त्याच्या मनाचा बांध पूर्णपणें मोकळा होऊन त्याने आपल्या दु:खाला तेथे बराच वाव दिला.

आयुष्यात केंव्हाही त्याला वाटलें नव्हतें असे औत्सुक्य वाटून आपलीं आईबापें खरोखर कोण असावींत हा प्रश्न त्याच्या मनाला बेचैन करूं लागला. आपलें स्वत:चें, अगदीं खास आपल्या जिव्हाळ्याचें या जगात कोणी तरी असावें असें त्याला अगदीं पहिल्यापासूनच वाटत होतें त्याच्या आयुष्यांत तारा आली तेंव्हांपासून ही त्याची भूक पुष्कळ अंशानें पुरी झाली होती. पण आतां ताराचा आणि त्याचा ऋणानुबंध त्याला कायमचाच तोडावा लागणार होता. ताराची इभ्रत त्याला स्वत:स तिच्यापासून दूर ठेवण्यास सांगत होती. त्याच्या आयुष्यांत पूर्वी केंव्हांही वाटत नव्हता असा रखरखीतपणा त्याला वाटूं लागला होता.

त्याच सध्याकाळीं आपल्या त्या जुन्या जीवनाची त्याला पुन्हा एकदां पुष्कळ दिवसांनीं आठवण झाली. त्या आठवणीसरशीं त्याची ती जुनी मित्रमंडळी त्याला भराभर दृष्टीसमोर उभी राहात आहे असा भास होऊं लागला. आपण त्या जुन्या मित्रमंडळीला जाऊन भेटावें असाही विचार त्याच्या मनांत जोरानें येऊं लागला. त्यांच्या इतकें आपलें जवळचें कोणी आहे असें त्याला वाटेना. तारा एक आहे, पण आपण तिच्या जवळही जातां कामा नये असें त्याला वाटूं लागलें. आपली ती लायकीच नव्हे असें त्याचें मन त्याला पुन्हा पुन्हा बजावून सांगू लागलें.

टिटऱ्या, काकड्या, रखमी आणि कचऱ्या यांना भेटण्याचा विचार त्याच्या मनात शेवटीं इतका प्रबळ होऊं लागला, की तो बिछान्यावरून उठला आणि खोलींतून बाहेर येऊन एखाद्या पिसाटासारखा धडधडा जिना उतरून खालीं रस्त्यावर आला. नंतर लोकांच्या गर्दीत आणि हळूहळू पसरणाऱ्या काळोखांत तो कुठें नाहींसा झाला कुणास माहीत.

★

प्रकरण अकरावें

# पत्र्याची चाळ

**एका** घाणेरड्या बोळीतून चदू आंत शिरत होता. दोन तीन हातच रूंदीची ती बोळ, पण जणूं काय मुंग्याची रीघ लागावी तशी माणसांची रीघ लागली होती तीत. कुजट दुर्गंधीने तिथलें वातावरण कसें भरून गेले होतें. आंतून भाडण, आरडाओरडा, गाणीं, लहान मुलांचीं तार स्वरातील केकाटणीं यांचा नुमता गोंधळ ऐकूं येत होता. त्या बोळीतून आत बाहेर येणाऱ्या जाणाऱ्या लोकाच्या अगाल्लाही एक प्रकारचा कुबट वास येत होता. त्यातलीं सशक्त माणसें तर खुशाल धक्के मारून पुढे होत. चदूला क्षणभरच कसेंसे झाले. आल्या पावलींच आपण परत फिरावे असेही त्याला वाटलें. पण दुसऱ्याच क्षणी त्याच्या मनांत विचार आला, की याच लोकातून आपण आलो. आपले रक्तातलें रक्त आणि मांसाचे मास म्हणजे या दूषित वातावरणांत राहाणारीं 'माणसें'! दैववशात् आपण या वातावरणातून बाहेर पडूं शकलो, नाहीं तर याच ठिकाणी आपलाही जन्म असाच गेला असता. हा विचार त्याच्या मनांत आल्याबरोबर का कुणास ठाऊक त्याच्या मनाला पुष्कळच समाधान वाटल्यासारखेंही दिसले. तो झपझप पावलें उचलून आत गेला. आपल्याला हवा असलेला जिव्हाळा त्या आतल्या बजबजपुरींतून तो शोधून काढणार होता.

किती तरी वर्षांनी तो त्या भूतलावरील यमपुरींत आला होता. इतकीं वर्षें लोटलीं पण जशीच्या तशीच परिस्थिति होती तिथें. ती पत्र्याची बैठी चाळ, त्या खुराडेवजा चाळींत कशीं तरी कोंबून भरलेलीं तीं माणसें, तीं भांडणें आणि मारामाऱ्या, त्या शिव्या, तो आरडाओरडा, दारुड्या

माणसांनीं मनाला वाटतील तसे घेतलेले ते कुठल्यातरी गाण्यांचे कसले तरी प्रलाप ! सारें कांहीं जसेच्या तसेच होते.

चदू लहान असताना या जागी नेहमीच येत असे. अयशाबीचें तें खुराडे त्याच्या अजूनही चांगलेंच लक्षात होतें. एकदां अयशाबी आजारी पडली, तेव्हां त्याने तिला बाहेरून चहा आणि पाव आणून चारला होता. एकदां त्यानें तिच्या डोक्यावर कसल्या तरी डबींतलें काळें औषध चोळले होतें. तेव्हांपासून अयशाबी त्याचे अगदीं लाड करायची. 'साऱ्या पत्र्याच्या चाळीत चदूच काय तो गुणाचा पोरगा आहे, बाकी सगळेच्या सगळेजण मेले मवाली आहेत' असें पुष्कळदां अयशाबी म्हणे, तेव्हा चदूला काय अभिमान वाटायचा. पण त्या गोष्टीला आतां किती तरी वर्षें लोटून गेलीं होतीं. आता आपल्याला अयशाबी ओळखील किंवा नाही कुणास माहीत, असा एक विचार अयशाबीच्या त्या खोपटाकडे वळता वळतां त्याच्या डोक्यांत येऊन गेला.

अयशाबीच्या दारापुढे तो येऊन उभा राहिला. दारांतच एक हाडाचा सापळा चिध्यात लपेटून बसला होता. डोक्यावर पांढऱ्या शुभ्र केसाची टोपी त्या सापळ्याचे वय सागत आहे असा भास होत होता. चदूने अगदीं बारकाईने त्या सांपळ्याकडे पाहिले. त्या सांपळ्यानेही वर मान करून चदूकडे पाहिले चदूनें ओळख दाखविणारें हसूं आपल्या चेहऱ्यावर धारण करून म्हटले,

" अयशाबी, ओळखल नाहींस का तू मला ? मी चंदू ! अशी बघतेस काय माझ्याकडे न ओळखल्यासारखं मला ? "

" चदू ? " अयशाबी चंदूचें बारकाईने निरीक्षण करीत म्हणाली, " चंदू ? कोण चंदू ? "

चंदूचें हृदय धडधडूं लागलें त्यानें खालीं वाकून अयशाबीजवळ आपलें तोंड नेत म्हटले,

" अयशाबी, तुला माझी ओळख पटत नाहीं, कारण मी अगदीं लहान होतो तेव्हां तूं मला पाहिलें होतेंस. मी त्या वेळी सात आठ वर्षांचा असेन

बघ. कुठून तरी फिरत फिरत मी इथं आलों, तुझ्या आजारांत मी तुला चहा-रोटी आणून द्यायचों. तुझ्या डोक्यावर मी सुंठ उगाळून घातली होती एकदां दोनदा. आठवतं का आतां तरी ?" चदू अगदीं आशेनें म्हणाला.

"मला काहीसुद्धां आठवत नाहीं. तुम्हांला मी कुठंच पाहिलेलं नाहीं." अयशाबी चदूला न्याहाळून पाहात मान हालवून म्हणाली. एक क्षणमात्र आपली ओळख अयशाबीला कशी पटवून द्यावी तेंच चंदूला कळेना तो असहायपणें आजुबाजूच्या त्या भिकार दृश्यावरून नजर फिरवीत उभा राहिला. सभोंवतालचीं तीं माणसें आपल्याकडे संशयानें पाहात आहेत असा त्याला भास झाला. असा पांढरपेशा माणूस त्याच्या त्या चाळीकडे आला कसा ? कुणाला शोधतोय तो ? गुप्त पोलीस तर नाहीं ? गुप्त पोलीसच ! त्याशिवाय असा पांढरपेशा आपल्या या भिकारड्या चाळींत येतो कशाला ? अयशाबीलाही तोच संशय आला होता असें तिच्या अस्वस्थ चळवळीवरून स्पष्ट दिसत होतें ती पुन्हा पुन्हा जोरानें मान हालवून, "मला चंदू अथवा चंद्या कुणीच माहीत नाहीं!" म्हणून सागत होती.

"अयशाबी, तूं मला ओळखीत नाहींस, पण मी तर तुला चांगला ओळखतो. टिटव्या, काकड्या, रखमी आणि कचऱ्या यांच्याबरोबर मी तुझ्या या घरांत पुष्कळदां आलेलों आहें. मला त्या पोरांचाही पत्ता पाहिंजे होता म्हणून मी आज इथ आलों होतों" चंदू म्हणाला, "अयशाबी, निदान त्यांचा तरी पत्ता तूं मला सांग. टिटव्या तुला माहीतच आहे."

टिटव्या-काकड्याच्या मागावर हा माणूस आहे तर ! अयशाबीनें भीत भीतच चदूकडे पाहिलें. तो खात्रीनें गुप्त पोलीसच असला पाहिजे अशी तिची बालबाल खात्री होत चालली. तिनें भीत भीत चंदूच्या त्या शेवटच्या प्रश्नाला उत्तर देत म्हटलें,

"ढिटऱ्या ? तो तर दोन महिन्यांमागंच तुरुगांत गेला. या वेळी देखील तुरुंग फोडून पळाला कीं काय ? तसं कांहीं झालं असलं, तर तें निदान मला तरी माहीत नाही. इकड तर त्याला मी पाहिलेला नाही. मागं तो तरुंग फोडून पळाला तें मी ऐकल होतं, पण त्यानतर त्याला परत धरून नेल म्हणतात. फिरून निसटला बिसटला असला, तर तें निदान मला तरी माहीत नाही !"

अयशाबीनें सांगितलेली बातमी अप्रिय तर खरीच, पण ती ऐकून चंदूला तितकें आश्चर्य वाटले नाही. जणू काय असें कांही ऐकायला मिळेल असेंच त्याला वाटत असावें खिन्न वदन करून तो थोडा वेळ गप्प उभा राहिला. नतर अयशाबीला तो फिरून एकदां म्हणाला,

"काकड्या तरी कुठ असतो तें तुला ठाऊक असेलच. तो तर तुरुंगांत नाही ना ?"

अयशाबीने पुन्हा एकदां भीत भीत वर पाहिले आणि चंदूचे चांगलेच निरीक्षण केलें. चदूला गुप्त पोलीसच समजून ती खरे तें सांगायला कचरली असावी. कारण काकड्या कुठें आहे, हें तिला चांगलें ठाऊक आहे असें तिच्या डोळ्यांकडे बारकाईनें पाहाणारास तेव्हांच दिसलें असतें. वर वर मात्र ती जरा चिडूनच म्हणाली,

"साहेब, मी गरीब बिचारी म्हातारी, मला काय माहिती आहे त्या मवाल्यांची ? कुठं तरी असतील कांहीं करीत ! मला काय ते सांगून सवरून थोडेच जातात ?"

"पण अयशाबी, त्यांचं राहाण्याचं ठिकाण तर माहीत असेल ना तुला ?"

"पण त्यांचं असं एक ठिकाण थोडंच आहे ? कधीं इच्या घरीं तर कधीं तिच्या घरीं. येतात न् जातात ! एखाद्या वेळीं गांठ पडलीच तर 'काय चालल्य ग म्हातारे !' म्हणून एखाद्यानं विचारलं तर विचारलं"

आपल्या प्रयत्नांचा कांहींच उपयोग होत नाहीं असें पाहून चंदू निराश होऊन जायला निघाला. जातांना अयशाबीला तो इतकेंच

म्हणाला, "अयशात्री, मला त्याची भेट घेतां आली असती, तर चांगलें झालें असतें त्यांनीं मला जरूर ओळखलें असतें."

चंदू जायला निघाला. तो चार दोन पावलेंही गेला असेल नसेल, इतक्यांत एक राकट माणूस अयशात्रीच्या घरांत शिरला. त्याच्या पाठोपाठ आणखीही कित्येक माणसे अयशात्रीच्या घरांत येऊन तिला त्या 'गुप्त पोलिसा'विषयीं अनेक प्रश्न विचारूं लागलीं. अयशात्रीनेंही अशा कांहीं रीतीनें चंदूचें व त्याच्या बोलण्याचें वर्णन केलें, कीं तो गुप्त पोलीसच अशी सगळ्याची खात्री झाली. अयशात्री म्हणत होती,

"अरे, तो चंद्या आठवतो का तुम्हांला? त्याची खडान्‌खडा माहिती तो मला सांगत होता. नि मीच तो चंद्या म्हणून मला भासवीत होता! पण मी कसली वस्ताद! दादच लागू दिली नाहीं त्याला? काकड्या, पोरा, तूं आतां संभाळूनशान् राहा. गुप्त पोलिसांनीं तुझा पिच्छा सोडलेला नाहीं" अयशात्री त्या राकट माणसाला उद्देशून म्हणाली. तें ऐकून त्या माणसानें असें कांहीं हास्य केले, कीं "जा ग अयशात्री, असल्या फडतुस गुप्त पोलिसाना ह्या काकड्यानं झुलत ठेवलय. मी काय त्या बेट्याला दाद देतों आहे थोडाच!" असेंच जणूं काय त्याला सांगायचें होतें. काकड्या तसं हसताच तेथें जमलेली ती सारी मंडळी काकड्याकडे आदरानें पाहू लागली होती. त्याच्या त्या तशा पाहाण्यावरून गुप्त पोलीसाला झुलवीत ठेवणे हा त्या वस्तींत सद्गुण तर समजला जात नाहीं ना, अशीही बघणारास शंका आली असती.

★

प्रकरण बारावें

## काकड्याला पत्र

चंदू आपल्या खोलीकडे आला तेव्हा दहाचा सुमार झाला होता. बत्ती न लावताच तो बिछान्यावर जाऊन पडला. केवढ्या आशेनें तो आज त्याच्या लोकांकडे गेला होता; पण जितक्या आशेने तो तिकडे गेला तितकीच जोराची निराशेची ठोकर खाऊन तो परत आला होता. त्याच्या डोक्यात विचाराचा कल्लोळ उसळला होता. खोलींतील अंधार त्याच्या मनातील अंधाराशीं तुलना करून आपणापैकीं कोण अस्सल अशा अर्थाचा प्रश्न करीत आहे असा भास होत होता. त्या अंधारातच कसल्यातरी विचित्र आकृति, त्या अंधाराहूनहीं काळ्याकुट्ट दिसणाऱ्या अशा आकृति, उभ्या आडव्या नाचत आहेत असें त्याला वाटलें. याच आकृतीना नंतर आणखी आकार येत चालला आणि लक्तरें गुंडाळून उभीं असलेली लहान लहान चार मुलें त्याला तेथें दिसूं लागलीं. या चार मुलासमवेत तो एकदा अयशाबीकडे गेला होता, त्या दिवसाचें चित्र त्याच्यापुढ उभे राहिल.

ते दिवस पावसाळ्याचे होते. पावसाळ्यात अयशाबीला खूप दमा उमटे. त्या दिवशीही तिला असाच खूप त्रास होत होता. सारखी धापा टाकीत पडली होती ती थोडा वेळ तिच्याकडे पाहून झाल्यावर तीं चार पोरें म्हणजे टिटव्या, काकड्या, कचऱ्या नि रखमी जायला निघालीं, पण आपला पाय काहीं बाहेर पडेना. आपण अयशाबीला बरें वाटावें म्हणून तिला काय हवें, काय नको तें पाहात तेथेंच बसून राहिलों.

अशा आणखीही कांहीं प्रसंगांचा चित्रपट त्याला त्या काळोखांतून दिसत आहे असा भास झाला. पण एके काळीं आपण जिची अशी अगदीं मनोभावें सेवा केली व मर्जी संपादन केली, तीच अयशाबी

आज आपण त्या प्रसंगांची स्वत: होऊन आठवण देत असूनही "मला नाहीं कुणी चंदू नांवाचं माहीत!" म्हणून म्हणत होती. हीच अयशाबी त्या वेळीं आपणास म्हणाली होती, "पोरा, तुझ्यासारखं मोठं मन या साऱ्या चाळींत नाहीं बघ कुणाला!" आणि त्याची आपण आज तिला आठवण करून दिली, तरी ती आपणांस म्हणाली, "का बाबा माझ्या मागं लागला आहेस उगीच. चंदू अगर चंद्या नांवाचं मला खरंच कुणीसुद्धां माहीत नाहीं!"

अयशाबीच्या स्मृतींतून आपण खरोखरीच नाहींसे झालों हें त्याला खरेंच वाटेना. आपलीं तीं चार पोरें आपणांस भेटलीं तर तीं देखील असेंच वागतील कीं काय! त्यांनीं देखील आपणांस ओळखलें नाहीं, तर काय करायचें? असाही आणखी एक विचार त्याच्या मनांत आला आणि तो आणखी खिन्न झाला. आपल्या आशेचा मनोरा ढासळून पडला आहे असें त्याला वाटूं लागलें.

पण इतक्यात पुन्हा तीं चार पोरें आपल्या दृष्टीपुढें उभीं आहेत असा भास त्याला झाला. त्यांतला तो टिटव्या त्याला ओळख दाखवून पाहिल्यासारखें करीत त्याच्याकडे पाहून हसत आहे असा भास त्याला झाला. याच टिटव्याने त्याला एक पत्र पाठविले होते, त्यांतल्या काहीं ओळी कुणी तरी आपल्या अगदीं कानाशीं ओरडून म्हणत आहे असा भास त्याला झाला.

"चंद्या, तुला जर बडोद्याला करमत नसलं तर परत मुंबईला का येत नाहींस निघून. सिताराम बिल्डिंग आता पार पाडून टाकली आहे. पण अयशाबी राहाते ना? त्या पत्र्याच्या चाळीच्या वळचणीला आम्हीं अगदीं छान निवारा शोधून काढलाय्! तिथं तुला देखील सहज जागा होईल."

वळचणींतून बाहेर पडून टिटव्या आतां सरकारचा पाहुणचार घेत कोठडीच्या निवाऱ्याला पडला होता!

टिटव्याच्या पत्रांची आठवण होतांच चदू उठला. त्यानें दिवा लावला आणि आपली सूटकेस उघडून तींतून एक डबा बाहेर काढला. याच डब्यात त्यानें तीं टिटव्याची पत्रें अगदीं जपून ठेवलीं होतीं. त्यानें तीं सगळीं पत्रें बाहेर काढलीं आणि एकामागून एक वाचून काढण्यास सुरुवात केली. एका पत्रांत टिटव्यानें लिहिलें होतें,

" चद्या, कचऱ्यासारखा बाप मला नाहीं हे बरं झाल. ..."

दुसऱ्या एका पत्रांत तो लिहीत होता—

" मला तूं पत्र पाठवशील तेव्हां भयरू पानवाला, फाकलंड रोड... या पत्त्यावर ते पाठीव.. .."

त्या दोन ओळी वाचल्याबरोबर चदूला कसली तरी आठवण झाली. त्याचें तोंड अगदीं प्रफुल्ल झालें. त्यानें तीं पत्रें घाईघाईने सूटकेसमध्यें बंद करून एक लहानसा कागद घेऊन त्यावर कांहींतरी मजकूर घाईघाईने खरडला आणि त्या कागदाची घडी करून ती खिशात घातली. त्याच्या अंगावरचे कपडे तसेच होते.

धडधडा जिना उतरून तो खालीं आला आणि निश्चयपूर्वक पावलें टाकीत फाकलंड रोडवरील एका लहानशा गल्लीत तो शिरला. बराच वेळ तो त्या गल्लींत फिरला पण त्याला हवे तें तेथें मिळालें नाहीं, म्हणून तो निराश दिसूं लागला. एक दोन हॉटेल्समधून शिरून त्यानें तेथील लोकांना त्या गोंगाटात ओरडून कांहीं तरी विचारून पाहिलें, पण कांहींनीं नुसतीच मान हालवून त्याला नकार दिला, तर कित्येकानीं त्याला उत्तरच दिलें नाहीं.

निराश होऊन तो परत आपल्या खोलीकडे निघाला. त्याचे पाय अगदीं जड जड झाल्यासारखे हळू हळू पडत होते. त्याचा कंठ इतका भरून गेला, कीं आपण आतां हुंदकाच देणार असें त्याला वाटूं लागलें. थोडा वेळ तो तसाच चालत गेल्यावर पुन्हा त्याला काय वाटलें कुणास माहीत. तो परत मागें फिरला आणि झपझप चालत जाऊन एका लहानशा बोळांतून पलीकडे गेला.

फिरून तो अयशास्त्रीच्या त्या पत्र्याच्या चाळीच्या बोळींतून आंत शिरत होता. मघाशीं तो आला त्या वेळीं जितकी गडबड आणि गोंगाट तेथें होता, त्या मानानें आतां बरीच शांतता तेथें नांदत होती तरी कोठून तरी भाडणाचे आवाज अस्पष्ट ऐकूं येत होतेच. एक अस्पष्ट किंकाळीही आपण ऐकली असा त्याला भास झाला. एक खरजुलें कुत्रें रस्त्यावर आडव्या तिडव्या पसरलेल्या माणसांच्या मधून अंग खाजवीत इकडे तिकडे पळत होतें. जवळच एका लहानशा मेणबत्तीभोवतीं कित्येक माणसें पत्त्याचा डाव खेळून आपापसात भाडण्याची पूर्व तयारी करीत होतीं. एक लहानसा पोरगा जवळच उभा राहून उगीचच आपला इकडे तिकडे पाहात होता.

चंदूला पाहिल्याबरोबर तो त्या पत्ते खेळणाऱ्या लोकाना "सुक् सुक्" करून काहींसें म्हणाला. त्यासरशीं पत्त्याचा तो डाव मोडून ते जणूं काय आपण गप्पा छाटीत बसलों आहों अशी बतावणी करूं लागले.

चदूनें त्याच्याकडे दुर्लक्ष केलें व तो अयशास्त्री राहात होती त्या घरापुढें जाऊन उभा राहिला. अयशास्त्री अजूनहों जागीच होती. खोकत खोकत ती आपली आपल्या त्या दागत उगीचच बसून राहिली होती. चंदू पुढें होऊन तिला म्हणाला,

"अयशास्त्री, माझं हें एव्हढं पत्र तू काकड्याला देशील का?"

अयशास्त्री काहींच बोलली नाहीं. तिनें तें पत्र चदूजवळून घेतलें आणि ती त्याच्याकडे थोडा वेळ न्याहाळून पाहूं लागली.

"हें पत्र तूं त्याला दिलेस तरी पुरे तो जेव्हा येईल, तेव्हां हें तूं त्याला दे."

अयशास्त्रीनें मान हालवली चंदू तिचे आभार मानून परत फिरला. तो गेल्याबरोबर अयशास्त्रीच्या घरात पुन्हा लोक जमले.

इकडे चदूला मात्र बरेंच समाधान वाटत असावें असें दिसलें. तो झपझप घराकडे चालला होता.

★

प्रकरण तेरावें

# खानदानाचा प्रश्न

दुसऱ्या दिवशी सकाळी चदूला बराच उत्साह आल्यासारखा दिसला. त्याने झटपट तयारी केली. खाली जवळच एका खाणावळीत काही खाल्ले आणि एक कसलेसे गाणे गुणगुणतच स्वारी ऑफिसात जाण्यासाठी जरा लवकरच निघाली.

इकडे तारा चदूला भेटायला त्याच्या खोलीकडे सकाळीच आली होती. काल एकाएकीच त्याचे काहीं दुखू लागले असावे, त्यामुळेच तो आपणाबरोबर फिरायला आला नाही असे तिच्या मनाने घेतले होते. तिने रात्रभर त्याच्या प्रकृतीची काळजी केली. कालच संध्याकाळी ती चंदूकडे एक चक्कर टाकून जाणार होती, पण तिच्या 'मा'ने सारखे काही ना काही काम काढून तिला घरीच डाबून ठेवले होते. सकाळ झाल्याबरोबर लवकर लवकर तयार होऊन ती आली होती खरी, पण अगदी थोडक्यात तिची आणि चदूची चुकामूक झाली होती. तिला चदूचाही खूप राग आला, पण नुसताच राग येऊन तरी काय उपयोग ? चदूच्या घराच्या बंद दारापुढे तसे नुसतेच उभे राहून काही चदू तिला भेटणार नव्हता. ती निराशेने तशीच परतली. आता सध्याकाळीं चंदू भेटल्यावर त्याच्यावर खूप रागवायचे असे तिने मनातल्या मनात ठरवले होते.

संध्याकाळी पाच वाजताच ती चदूकडे आली, पण अजूनही दाराला कुलूप होते त्यानंतर तिनें चागल्या तीन चार खेपा चदूकडे घातल्या, पण प्रत्येक वेळीं तिची निराशाच होत गेली. शेवटी शेवटीं तर ती अगदीं रडकुंडीलाच आल्यासारखी दिसू लागली. ताराची 'मा' ताराची ती अस्वस्थता अंगदीं बारकाईनें पाहात होती, पण ती ताराला एक अक्षर देखील बोलली नाहीं. जें घडतें आहे ते अगदीं आपल्या मनासारखेच

घडते आहे असे तिला वाटत असावेसे तिच्या मुद्रेवरून दिसत होतें. ताराची मात्र अगदी तडफड चालू होती. तिने मध्येच आपल्या 'मा' ला विचारले.

"मा, चदू आला होता का ग इकड, मी बाहेर गेले तेव्हा ?" आपण चदूकडे गेलो, तेव्हा आपल्या मागे चदू इथे येऊन तर गेला नाही ना असा एक सशय तिला आला, म्हणून तिने हा प्रश्न विचारला असावा. ताराच्या 'मा'ने काही एक न बोलता नुसती मान हालवून नकार दिला. वादळापूर्वीची तर शातता नव्हती ना ती ? तारा आणखीच त्रस्त दिसूं लागली. शेवटी ती तिच्या 'मा'ला म्हणाली, "मा, मी जाते ग चंदूकडे. चंदू इकड आला तर त्याला सांग, मी त्याच्या खोलीकडे गेले म्हणून !"

ताराची 'मा' त्यानतर काही तरी बोलणार होती असे वाटलें, पण ती तसे कांही बोलायच्या आतच तारा बाहेरही निघून गेली होती. ताराची 'मा' कपाळावर आठ्या घालून काही तरी विचार करीत एका बैठकीवर बसून राहिली. ती बराच वेळ तशी बसून होती, इतक्यात तारा आंत आली. ताराच्या त्रस्त मुद्रेवरून आणि अस्वस्थ हालचालीवरून जे ओळखायचे तें ताराच्या 'मा' ने ओळखले. पण जणूं काय सहज प्रश्न करावा तसा प्रश्न करून तिने ताराला विचारले,

"भेटला का चदू त्याच्या घरी ?"

"नाही ग मा—" तारा चिडून म्हणाली.

"मला वाटलच तस !" ताराची 'मा' म्हणाली.

पण तारानें तें ऐकले किंवा नाही कुणास ठाऊक ती आपल्या खोलीकडे निघून गेली. तिच्या पाठोपाठ तिची 'मा'ही तिकडे गेली. तारा आपल्या पेटीत कांहींतरी उचकवाचक करीत बसली होती. ताराची 'मा' तिच्या जवळ जाऊन बसत अगदी निश्चयी स्वराने म्हणाली,

"तारा, मला तुझ्याशी काहीं तरी बोलायचं आहे."

तारा गोंधळून जाऊन आपल्या आईकडे प्रश्नार्थक मुद्रेनें पाहातच राहिली एवढी मोठी प्रस्तावना करून ही बोलणार तरी काय असाच भाव तिच्या त्या दृष्टीत साठला होता.

" चदूसारखा हुषार आणि गुणी मुलगा शोधूनही सापडणार नाही. बडोद्याला तो सगळ्याना कसा आवडता वाटत होता, ते सगळ मी ऐकून आहे, पण तरीही त्याच्याशी सबध ठेवताना तो जितक्यास तितकाच ठेवला पाहिजे." ताराची 'मा' म्हणत होती. पण तारा तिला मध्येच अडथळा करून जरा क्रुद्ध स्वरानेच म्हणाली,

" म्हणजे, म्हणतेस तरी काय तू मा ? "

वास्तविक ताराने ते शब्द क्रुद्ध स्वराने उच्चारले जाऊ नयेत म्हणून पुष्कळच प्रयत्न केला होता, पण माणसाने मनातील खरी भावना कितीही दडवून ठेवण्याचा प्रयत्न केला तरी तिचा स्फोट होतोच, नाहीं का ? ताराची 'मा' जरा सौम्य आवाजानेच म्हणाली,

" बेटा, मी जें काही तुला सागते, ते तुझे कल्याण कशात आहे तेच पाहून सागते आहे "

" म्हणजे ? मा, तुझ म्हणण मला समजत नाही." या वेळीं ताराच्या मनावरचा ताबा सुटू लागून हे वाक्य ती जवळ जवळ ओरडूनच म्हणाली होती. पण तिची 'मा' देखील कमी नव्हती काही.

" चदूविषयी माझ्या मनांत देखील पुष्कळ आदर आहे." ती म्हणाली, " त्याने तुला मृत्यूच्या दाढेतून ओढून काढलें! पण त्या त्याच्या कामगिरीचा मोबदला त्याला आता मिळाला आहे कुणाचा कोण हें देखील माहीत नसतां शेठजीनीं त्याला स्वतःच्या पैशानें लहानाचा मोठा केला; त्याच शिक्षण करून त्याला स्वतःच्या हाताखालींच कामाला लावलें; पण याचा अर्थ असा नव्हे, कीं चंदू आमच्या योग्यतेचा झाला. खानदानाचा प्रश्न या सगळ्याहून वेगळा आहे. तारा, खानदानी मिळवतां येत नाहीं. ती जन्मानेच मिळालेली असते!"

ताराच्या 'मा'चें तें व्याख्यान आणखीही लांबलें असतें, पण तारानें तिला पुढे बोलूच दिलें नाहीं—

"मा, तुझ्या ह्या सगळ्या म्हणण्याचा अर्थच मला समजत नाही. चंदूविषयीं आणखी काहीं तू आता बोलू नको. चंदू कुणीही असो, तो होता म्हणून मी आहे त्याचे आईबाप कुणीही असोत, मला त्याच्याशीं कर्तव्य नाही. मा, मा, ज्यान तुझ्या एकुलत्या एक ताराला तुझ्या स्वाधीन केल, त्या चदूविषयी इतक अनुदार तुझ्यान बोलवल तरी कस ? माणसाला खानदानी जन्माने विनायास मिळत असेल, पण त्या फुकटात मिळालेल्या क्षुल्लक गोष्टीचा अभिमान धरावा अस आहे तरी काय तिच्यात ? केवळ जन्मानं मिळवलेल्या मोठेपणापेक्षा आचरणान मिळवलेली माणुसकीच श्रेष्ठ नाही का ? खानदानी घराण्यात चदू जन्मला नसेल, पण स्वत च्या माणुसकीने तो सर्वाना हवासा वाटतो. मा, तुझ्या मनात त्याच्याविषयी असा विचार तरी का आला ? "

हे सर्वच तारा अशा आवेशाने बोलली, की ताराची 'मा' तर अगदी हतबुद्धच झाली. पण वर वर तसे काही न दाखविता ती ताराला म्हणाली,

"तारे, मी जे काही बोलले, ते सार काहीं तुझ्या हिताच बोलले. आज दिवसभर तुझी मनःस्थिति कशी झाली आहे, ते मला दिसत नाही असं नाहीं. पण चदूला त्याची गधवार्ताही नाही. काल सध्याकाळी तो आला, पण तें केवळ टाकणे टाकायलाच आला. तुला त्यानें आपण आजारी आहों म्हणून सागितलें, पण तो काहीं आजारी नसावा ! बरं वाटत नाही अशी तुला थाप मारून तो दुसऱ्याच कुणाबरोबर तरी फिरायला तर गेला नसेल ? "

ताराला रागारागानें काहीं तरी बोलावेसे वाटलें, पण तिच्या तोंडांतून मात्र कांहीच शब्द निघेनात. तिलाही 'मा'चें बोलणे पटायला लागले होते कीं काय ? ताराची 'मा' आणखीही पुष्कळ वेळ बोलत बसली

होती. ताराला ते सारेच बोलणें ऐकूं येत होते किंवा नव्हते, कुणास माहीत. ती कसला तरी निराळाच विचार करीत असावी असे तिच्या चेहऱ्यावरून दिसलें. थोडा वेळ या प्रकारे विचार करून झाल्यावर ती तेथून उठली आणि जिना उतरून खाली रस्त्यावर आली. फिरून एकवार ती चदूच्या घराकडे निघाली होती. ताराची 'मा' गच्चीवर उभी राहून ताराच्या पाठमोऱ्या आकृतीकडे टक लावून पाहात होती.

रस्त्याने जाताना ताराच्या डोक्यात विचार घोळत होता.

"घरी येऊ नको म्हणून 'मा' ने तर चदूला सांगितले नाहीं ना? निदान आता तरी चदू भेटेल का आपल्याला त्याच्या घरी?"

खरच त्यावेळी तरी तिला चदू भेटला असेल काय?

★

प्रकरण चौदावें

## ‘ चिमणीचें खोपटें ’

तारा चदूच्या घराकडे खेपा घालीत होती, त्याच वेळी चदू कामावरून सरळ अयशाबीच्या घराकडे गेला होता. काल दिलेल्या पत्राचे काहीं उत्तर आले असले तर पाहावे हाच त्याचा तिकडे जाण्याचा हेतु होता. अयशाबीच्या घरी जाऊन त्याने जेव्हा विचारपूस केली, तेव्हा अयशाबीने धुरकटून पिवळा झालेला एक कागदाचा चतकोर तुकडा त्याच्या हाती दिला तो कागद पाहून चदूची उत्सुकता तर कमालीची वाटली. त्याने आधाशाप्रमाणे त्या कागदावर पेन्सिलीने कसा तरी खरडलेला तो गिचमीड अक्षराचा मजकूर वाचून पाहिला. त्याची प्रत्येक ओळ वाचताना चदूचा चेहरा प्रफुल्लित होत गेला. एकदां, दोनदा, दहादा त्याने तो मजकूर वाचून पाहिला नतर जवळजवळ उडीच मारून, तो अयशाबीचे आभार मानून कुठेतरी जायला निघाला. अयशाबीने त्याच्या हातात जो कागद दिला, त्यावर पुढील अर्थाचा मजकूर होता–

“ चद्या, तू जर खरोखरचा ‘ तो ’ चद्या असशील तर आज रात्री साडेदहा वाजता चिमणीच्या खोपटाजवळ येऊन उभा राहा. मी तुला तिथें भेटेन. जर तूं साडेदहाला तिथे आला नाहीस, तर मग मात्र माझी भेट व्हायची नाही. आपली खुणेची शीळ घालून माझी खात्री करून दे.

—काकड्या ”

चिमणीचे खोपटे ? चदूला त्या जागेची चांगलीच आठवण होती. एकदां भैय्याने त्याना सिताराम बिल्डिंगच्या दादराखालून हुसकून लावले होतें, तेव्हा एका अधाऱ्या बोळातून तो, टिटव्या नि काकड्या एका बोगद्यासारख्या ठिकाणी गेले होते. ती रात्र त्यांनी तेथें घालविली

होती त्यानतर जेव्हा जेव्हा त्याना इतर कुठे निवारा मिळत नसे, तेव्हा तेव्हा ते या बोगदेवजा ठिकाणी येऊन निजत. त्या ठिकाणाला त्यांनी "चिमणीचे खोपटे" असे नाव दिले होते. भेटीसाठी काकड्याने तीच जागा पसत केली, याचीं कारणे उघड होती. चदू जर खरोखरच चदू असेल तर त्याला ते ठिकाण माहीत असायलाच पाहिजे. दगाफटका करण्याकरता जर कुणी डिटेक्टिव्हाने हा डाव रचला असेल, तर असा डिटेक्टिव्ह "चिमणीच्या खोपटा" कडे येतो कशाला ? समजा, कांहीं तरी लुच्चेगिरी करून तो आला आणि भेटीअती तो गुप्त पोलीस आहे अशी काकड्याची खात्री झाली, तर तो मग त्या खोपटातून बाहेर पडणार नव्हता ज्या बोळातून तो खोपटाकडे येईल त्याच बोळात काकड्याचे मवाली मित्र दबा धरून बसणार होते. त्याने नुसती शीळ घालण्याचा अवकाश . !

काकड्याने चदूला खुणेची शीळ घाल म्हणून सागितले होते. ही खुणेची शीळ तर चदूला चागली आठवत होती. कित्येक दिवसातून त्याने ती प्रत्यक्ष घातली नव्हती हे जरी खरे, तरी आपण ती शीळ सहज घालून आपली ओळख त्याला खात्रीने पटवून देऊ असे त्याला वाटले. रस्त्याने चालता चालता त्याने एकदा दोनदा तशी शीळ घालूनही पाहिली; ती ऐकून, जाणारे येणारे लोक त्याच्याकडे अशा काही चमत्कारिक नजरेने पाहूं लागले, कीं "माणूस तर चागला समजस दिसतो आहे, मग असा वेड्यासारखा शिट्या काय वाजवीत चालला आहे !" असेच जणू काय त्यांना म्हणावयाचे होते.

त्या संध्याकाळी चदू घराकडे गेलाच नाही. इकडे तिकडे भटकूनच त्याने दहापर्यंतचा वेळ घालवला आणि दहा वाजण्याच्या सुमारास तो त्याच्या त्या पुरातन स्थळाकडे निघाला 'चिमणीच्या खोपटा'कडे घेऊन जाणाऱ्या अरुद बोळीतून जातांना जणूं काय नेहमींचा पायाखालचा रस्ता असावा तसा चंदू चालला होता. आज इतक्या वर्षांनी तो त्या बोळीत शिरला होता, पण तीच पूर्वीची घाण, तीच

दुर्गंधी, तोच अंधार, तसाच खडबडीत रस्ता; सगळे वातावरण तेच तें होते. दहा वीस पावले झपझप चालून गेल्यावर बोळ बरीच अरुद झाली. एक मोठी घूस तुरुतुरु पळत चदूच्या पायांत घुटमळून कुठे तरी नाहीशी झाली एका अधारांतील खाबाआड दोन घनदाट छाया उभ्या होत्या. कोणाच्या छाया असतील त्या ? चदू आलेला पाहाताच त्या चपापून अधिक निश्चल झाल्या. अंधारात त्यांचे अस्तित्व जणूं काय लोपूनच गेले होते. त्या सगळ्याकडे न पाहाताच चदू झपाट्याने पुढे चालला होता आजूबाजूच्या परिस्थितीचा विचारही त्याच्या मनाला शिवला नव्हता. एकच एक ध्यास त्याला लागला होता एकच विचार त्याच्या डोक्यात घोळत होता. तो म्हणजे 'आपली माणस' शोधून काढायची.

चालता चालता तो एके जागी थाबला. त्याने काळोखातून त्या जागेचे निरीक्षण केले. तीच ती जागा, अशी खात्री करून घेतली व नतर आपली दोन बोटे तोडात घालून त्यानें हलकेच एक शीळ घातली. त्याच्या त्या खुणेला प्रत्युत्तर आले नाही. पुन्हा एकदा जरा मोठ्यानेच त्यानें शीळ घातली. तरीही प्रत्युत्तर नाहीं ! चदू अस्वस्थ दिसू लागला. काकड्या आला नाही की काय ? किंवा आला असूनही त्याने आपली शीळ ऐकली नाही ? असा विचार त्याच्या मनांत डोकावून गेला. तिसऱ्या वेळी त्याने अगदी जोराने शीळ घातली.

या वेळी त्याच्या त्या खुणेच्या शिट्टीला जवळच अंधारातून प्रत्युत्तर आलें. त्याचा चेहरा प्रफुल्लित झाला. आनदाने त्याचे हृदय धडधडूं लागले. "काकड्या ऽ" म्हणून त्याने उत्कठेने हाक मारली. प्रत्युत्तरा-दाखल आणखी एक वेळ त्याला ती शीळ ऐकू आली.

"काकड्याच तो !" तो मोठ्याने स्वतःशीच बोलला. नतर आणखी एकवार त्याने एक कर्कश शीळ घालून "काकड्या ऽ" अशी जोरानें हांक मारली.

अधारांतून एक व्यक्ति पुढे आली.

"चद्या—" त्या व्यक्तीने दबलेल्या आवाजाने हाक मारली.

चंदू पुढें झाला. उत्तरादाखल काकड्याला मिठी मारायचाच त्याचा बेत होता; पण तो पुढे झाल्याबरोबर काकड्या जरा मागे हटला आणि चदूला म्हणाला,

"दगा फटका असला तर तुला इथून जाताच यायचं नाहीं. बोल, कोण आहेस तू ?"

"म्हणजे ?" चदू गोंधळून म्हणाला, "मला तू अजून देखील ओळखलं नाहीस का ? काकड्या, तोच मी तुमचा चद्या मी काहीं दगाफटका करायला आलो नाही इथ तुम्हाला भेटायला आलो आहे. काकड्या, बडोद्याला शिकायला जाताना मी तुम्हाला परत येऊन तुमच्यासाठी काही तरी करण्याच वचन दिल होत; आठवत नाही का तुला ते ?"

"आठवतयू मला ते " काकड्या अधारातून घोघऱ्या आवाजानें म्हणाला, " पण तू आम्हाला कसली मदत करणार ? "

" त्याच्याविषयी नतर आपण बोलू. तूर्त मला तुम्हाला भेटून घ्यायच आहे. टिटव्या तुरुगात आहे, म्हणून अयशाबी म्हणत होती. त्याची मी तिकडे जाऊन केव्हा तरी भेट घेईन, पण तूर्त तुला, रखमीला अन् कचऱ्याला मी भेटायचं ठरवलं आहे. रखमी अन् कचऱ्या कुठं आहेत ते तुला माहीत असेलच ? "

" असेल, नाही तर नसेलही. " काकड्या धूर्तपणाने म्हणाला. त्याचा सशय अजून पुरा नाहीसा झाला नव्हता. तो आपलाच हेका चालवीत म्हणाला, " पण तू आम्हाला मदत कसली करणार ते तर साग. "

चदू जरा वेळ गडबडूनच गेला. पहिलीच पुनर्भेट अशा प्रकारची होईल अशी कल्पनाही त्याला नसावीसे दिसले. जरा वेळाने तो काकड्याला म्हणाला, "काकड्या, मीच तो चद्या अशी अजून तुझी खात्री झाली नाहीं अस दिसत " नतर अधारातून एका जागेकडे हात दाखवून तो म्हणाला, "आपण एकेकाळी गळ्यात गळा घालून त्या वळचणीला झोपलो आणि एकमेकाची सुखदुःख वाटून घेतली; त्या वेळी घासांतला

घास एकमेकाना आपण दिला, एकमेकाबरोबर खेळलो, हसलो आणि रडलो. आता मी शिकून चागल्या मार्गाला लागलो असलो, तरी माझ्या चागुलपणातून तुम्हालाही जे मला देता येईल ते देण्याची माझी इच्छा आहे "

काकड्याला त्याच्या त्या बोलण्यातला खरा आशय समजलाच नाही असें दिसले. कारण तो चदूला म्हणाला, "तू चवाच आहेस अस मलाही वाटायला लागल आहे आमच्या टोळीत तू जर येणार असशील, तर आम्ही तुला परत घ्यायला तयार आहो. तुझा आम्हाला पुष्कळ रीतीनें उपयोग करून घेता येईल. तुला कोणत्या पद्धतीने चोरी करता येते, ते नंतर पाहातां येईल. पण आधी तू आमच्याशी बेइमानी करणार नाहींस अस वचन दे. पोलीसानी तुला पकडल, तर तू इतराची नाव सागता उपयोगी नाही —"

पण काकड्याला मध्येच थाबवून चदू म्हणाला,

"चोरी वगैरे करायला माझ्याकडून तुम्हाला मदत होईल अस मी म्हणालो नाही. माझी तुम्हाला असल्या कामात मुळीच मदत होणार नाही "

"मग कुठल्या कामात तू आम्हाला मदत करशील?" चंदूला मध्येच अडवून काकड्याने विचारले.

"त्याच्याविषयी आपण नतर बोलू. प्रथम माझी रखमीची आणि कचऱ्याची भेट घडवून आण. मग आपण त्याविषयी सावकाश बोलूं."

काकड्याने जरा टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला, पण नतर त्यालाच काय वाटले कुणास माहीत. तो चदूला म्हणाला,

"पोलीसाना तूं आमचा पत्ता सांगणार नाहीस ना?"

"मी वचन देतो, की मी होऊन तुमचे कोणतेही गुपीत कुणालाही सागणार नाही." चदू म्हणाला. काकड्याने त्याला आपल्या मागून येण्याची खूण केली आणि त्या काळया काळोखात तो चदूला घेऊन नाहीसा झाला.

★

प्रकरण पधरावे

# हंगेरियाचा कोल्हा !

**काकड्या** आणि चदू निरनिराळ्या गल्ल्या ओलाडीत एका कुठल्याशा ठिकाणी येऊन पोचले. रस्याच्या कडेला एक कापडी तंबू उभारलेला होता. तबूच्या दारात बरीच गर्दी जमलेली असून एका मोडक्या बाकावर विदुषकासारखा पोषाख केलेला एक माणूस हातातील घटीवर लाकडी हातोड्याने टोले देत ओरडत होता, "दोन पैसे, दोन दोन पैसे दोन दोन पैसे !"

काकड्या आणि चदू त्या तबूच्या जवळ आले. तबूवर कशा तरी वेड्यावाकड्या अक्षरात लिहिलेली पाटी टागली होती—

**हंगेरियाचा कोला**

**तोड बाईचा शरीर कोल्ह्याचा**
**हे तुमच्या समोर दिसेल**
**आणि नसेल, मग समोर येईल**

**दोन पैसे, २ पैसे, बघून जा**

ज्याना लिहिता वाचता येत नव्हते, त्याच्याकरिता तो विदुषकाच्या पोषाखातला माणूस ओरडून म्हणत होता, "तोंड माणसाचा ! शरीर कोल्याचा"

"दोन पैसे ! दोन पैसे ! !"

"हगेरियाचा कोल्हा ! हिंदुस्थानी बोलतो !"

"तोड-बाईचा ! शरीर कोल्याचा ! !"

"दोन पैसे, दोन पैसे !"

काकड्या त्या तबूच्या दाराशी थाबून चदूला म्हणाला,

"आपण जाऊन पाहूं या का हे?"

चदूने एक आणा त्या माणसाला दिला आणि काकड्याबरोबर तो आंत जाऊं लागला. त्याच वेळीं त्या विदुषकाला आश्चर्य वाटले असें दिसले. त्याने अशा काही रीतीने काकड्याकडे पाहिले, की "तू आज तिकीट घेऊन आंत चाललास हे नवलच म्हणायचं!" असेच जणूं काय त्याला सुचवावयाचे असावें. पण तितक्यात काकड्यानेच डोळ्याने खूण करून त्याला "काही बोलू नको" म्हणून सुचविले.

आत गेल्यावर चदू आणि काकड्या "हगेरियाचा कोला" पाहूं लागले. वर्णन केल्याप्रमाणे खरोखरच त्या कोल्ह्याचे तोड बाईचे आणि शरीर कोल्ह्याचे होते. पण जरा बारकाईने पाहिले असते, तर त्या प्राण्याचें तोंड मात्र खरे असून शरीर नकली आहे हे लक्षात यायला फारसा वेळ लागला नसता. काकड्याने त्या विचित्र प्राण्याला उद्देशून प्रश्न विचारायला सुरुवात केली.

"कहा के रहिनेवाली है?"

"हंगेरिया ऽ!" कोल्हा म्हणाला.

"क्या खाती है?" काकड्यानें विचारले.


"दूध पिती है."

पण का कुणास ठाऊक, काकड्या हे प्रश्न विचारीत असताना तो स्त्रीमुखी कोल्हा हळूच हसला. जणूं काय त्याची आणि काकड्याची चांगलीच ओळख असावी पण तो एक नेहमीचाच प्रकार असावा असें बघ्यांना वाटले.

"अग हसतंय् देखील ग चंद्रे—" एक बाई मोठा शोध लावल्या-सारख्या आवाजाने म्हणाली.

"काय देव करील नि काय नाही!" दुसरीने साथ दिली. इकडे काकड्या आणि चदू तबूबाहेर पडून रस्त्याला लागले होते.

आणखीं काही वळणे घेऊन ते एका हॉटेलात शिरले. चहा पितां पिता काकडयाने विचारले,




‘ कहा के रहिनेवाली है ? ’

"चंद्या, तुला कचऱ्याला न रखमीला भेटायच होतं ना ?"

"होय रे. म्हणून तर तुझ्याबरोबर इथवर आलोयू मी. आतां तीं दोघंही खूप मोठालीं झालीं असतील, नाहीं का ? त्यांना केव्हां पाहीन अस मला झालयू !"

काकड्या 'ही ही हीः' करून हसला. का हसला कुणाला माहीत. चदू गोंधळून त्याच्याकडे पाहूं लागला. काकडया हसत म्हणाला,

"ही ही ही ! पण त्यांना तर तू पाहिल आहेस थोडया वेळापूर्वी !"

"कुणी मी ? कचऱ्याला अन् रखमीला ?"
चदूने आश्चर्याने काकडयाला विचारले.

"हो हो तू !" काकडया म्हणाला. "तू नि मी दोघेही आता तिथूनच आलो की !"

"काकड्या, अस रे काय करतोस ! साग ना आपण त्याना केव्हा पाहिल ते !"

काकड्या पुन्हा एकदा "हीः हीः हीः" करून हसला. डोळे मिचकावीत तो म्हणाला,

"दिसेल आणि नसेल ! मग समोर येईल ! ! दोन पैसे दोन पैसे ! !"

"म्हणजे ? तो विदुषक—"

"कचऱ्या !" काकडयाने वाक्य पुरें केलें.

"आणि हगेरियाचा कोल्हा—"

"रखमी ! !" काकड्या म्हणाला. "पण चंद्या, तू आमचं गुपीत कुणालाच सागणार नाहींस असं मला वचन दिलं आहेस ! दगलबाजी केलीस तर पाहा माझ्याशी गाठ आहे !"

चंदूनें काकड्याच्या खाद्यावर हात ठेवला आणि अशा काहीं रीतीनें त्याच्याकडे पाहिलें, कीं जणू काय त्याला म्हणायचें होते,

" माझं वचन मी विसरलों नाहीं........"

काकड्याचें समाधान झालें. "आमच्या अनेक धंद्यांपैकीं हा एक धंदा आहे. पण तो करतांना देखील शिपुर्डे आमचा पाठलाग करण्याचं सोडीत नाहींत. चिरीमिरी तरी कुणाकुणाला द्यायची ! चंद्या, आमच्या टोळींत तूं आलास, तर तुझा आम्ही पुष्कळ उपयोग करून घेऊं. पण—"

चंदू तें सारें चऱ्हाट ऐकत होता कीं नव्हता कुणास माहीत. तो काकड्याला म्हणाला,

" काकड्या, मी आतां तुम्हांला सोडून जाणार नाहीं. मला आतां तुमच्या बरोबरच राहिलं पाहिजे. पुष्कळ गोष्टींत माझा तुम्हांला उपयोग होईल. माझं वचन पुरं करायची वेळ आतां आली आहे. "

चंदूचें तें उत्तर काकड्याच्या बोलण्याला उद्देशून असो वा नसो, त्याला मात्र तें आपल्याच म्हणण्याला दुजोरा देणारें आहे असें वाटलें. त्यानें चंदूचा हात आपल्या हातांत घेऊन त्याच्याशीं जोरानें हस्तांदोलन केलें; जणूं काय त्याला असें म्हणायचें होतें, कीं—

" चंद्या, याच क्षणापासून तूं आमच्या टोळींतील एक झालास असें समज. आतां तुझ्यापासून आम्ही कांहींही गुप्त ठेवणार नाहीं. आतां तुझं गुपित तें आमचं गुपित आणि आमचं गुपित तें तुझं गुपित. "

★

प्रकरण सोळावे

# वळणाचें पाणी !

चंदू चर्नीरोडवरील खोली सोडून फॉकलड रोडवर पत्र्याच्या चाळीत राहायला गेला, हे वर्तमान ऐकून शेठजीना आश्चर्याचा धक्काच बसला दुसऱ्या कोणी ते वर्तमान सागितले असते, तर त्याच्या सागण्यावर विश्वास न ठेवता त्या सागणाऱ्या व्यक्तीलाच त्याने वेड्यात काढले असते. पण खुद्द चदूनेच ते शेठजीना सागितले होते.

“शेठजी, तुम्ही मला लहानाच मोठ करून चागल शिक्षण दिलत. तुमचे आभार मानायला मला शब्द देखील सुचत नाहीत. पण जो चागलेपणा मला मिळाला तो माझ्याने स्वत. करताच ठेववत नाहीं.” चदू म्हणत होता, “तो चागलेपणा ज्याच्यातून मी आलो, त्या माझ्या लोकाना देखील दिल्याशिवाय मला चैनच पडायच नाहीं. मला मिळालेला प्रकाश मी माझ्याकरताच न ठेवता अधारांत खितपत पडलेल्या त्या ‘माझ्या लोकांना’ देखील द्यायच मी ठरवल आहे.”

चदूचे ते समर्थन ऐकून शेठजी बरेच गभीर झाले थोडा वेळ विचार करून ते चंदूला म्हणाले होते,

“गरीब लोकाविषयी तुला इतका जिव्हाळा वाटतो म्हणून मला आनद वाटतो. त्याना तूं हवं तर साक्षर कर, स्वच्छता शिकव अगर तुला हवं ते तू त्यांच्यासाठीं केलस तरीही मला काहीच म्हणायच नाहीं. पण त्याच्या त्या भिकार वस्तीत जाऊन राहाण्याच हे तुझ वेड मात्र मला तितकं स्पष्ट रीतीन समजत नाही.”

शेठजींच्या त्या बोलण्यावर चंदू म्हणाला होता,

“शेठजी, मी या गोष्टीवर पुष्कळ विचार केला आहे. या लोकांपासून फटकून राहिलं आणि नुसतच ठरावीक वेळी जाऊन त्यांना स्वच्छतेवर

व्याख्यान झोडलं, तर हे लोक तुमचं तें व्याख्यान मन लावून ऐकतील; पण व्याख्यान संपल, कीं घरीं जाऊन पूर्ववत वागूं लागतील. साक्षरतेचा वर्ग चालवून कदाचित् काहीं लोकाना मी साक्षरही करू शकेन, पण मला त्याना केवळ अशा वरवरच्या गोष्टी शिकवूनच समाधान वाटणार नाहीं. त्यांच्यात त्याच्यासारख होऊन मी त्याचीं मन जिकून घेईन आणि नवीन विचार नि आचार स्वतःच्या वागणुकीने त्याच्यापुढ माडून त्याना सुधारीन." शेठजीना चदूचें ते सगळेच बोलणे पटले नव्हते, पण त्यानी त्याला मग अडथळाही केला नव्हता. ते त्या नंतर त्याला इतकेच म्हणाले होते, की " चदू, तू आता मोठा झालास. तुझ्या आयुष्याचा तू मालक आहेस. मला जे वाटलं ते मी तुला सागितल. त्याप्रमाणेच तू वागल पाहिजेस अस नाही."

शेठजींनीं चदूचा तो नवा विचार घरीं ताराला आणि ताराच्या 'मा'ला सागितला, तेव्हा ताराची 'मा' म्हणाली होती,

"मला चदूचे ते विचार ऐकून मुळींसुद्धा नवल वाटत नाहीं! वळणावरच पाणी आहे ते, वळणाला वळणारच !"

वास्तविक ताराने त्यावर काही तरी बोलायला पाहिजे होते. पण ती काहींच बोलली नाही याचे शेठजीनाही नवल वाटले. ते ताराला म्हणाले,

"तुला त्याने त्याचे विचार बोलून दाखवले असतील, नाहीं ग तारा. तुला काय वाटत त्याच्या त्या कल्पनेविषयीं ?"

पण तारा बोलण्यासाठीं तितकी उत्सुक दिसलीच नाहीं. ती शेठजींना इतकेंच म्हणाली,

"बापजी, मला तो दोन दिवस भेटलाच नाहीं."

"जाऊं दे ग तारे. तू तर भारीच बाई ही. अग मी तुला सांगितलं तेच खर. माणसाचे जन्म-सस्कार काहीं एकाएकीं नाहींसे होत नाहींत. चदू कितीही झाला तरी—"

पण ताराच्या 'मा' ला मध्येच अडथळा करून शेठजी म्हणाले,

"माझं नि त्याचं बोलण झालं, त्यावरून मला तरी त्याचं तें करण तितकंसं वावगं दिसत नाहीं."

शेठजी आणखीही पुष्कळच बोलत होते, पण तारा तें बोलणें ऐकतच नव्हती की काय कुणास ठाऊक. तिच्या डोक्यांत काहूर उठलें होतें आणि कुठला तरी आवाज तिच्या कानाशीं ओरडत होता—

"वळणाचे पाणी !"

"वळणाचे पाणी ! !"

⁂ ⁂ ⁂

इकडे त्याच वेळीं पत्र्याच्या चाळीत एकच धांदल उडाली होती. चंदूनें स्वतःकरता पसंत केलेली खोली तो घासून पुसून लख्ख करीत होता. काही उघडी नागडी पोरे त्याला भिंती घासू लागायला मदत करीत होती. काकड्या त्याला सामान लावायला मदत करीत होता. बघे लोक बघत होते. इतकी अपूर्वाई त्या चाळीत पूर्वी केव्हाही दिसून आली नसेल. असा पांढरपेशा माणूस आपल्यासारख्याच्या चाळींत राहायला आला म्हणजे काय ? जगातलें तें नववे आश्चर्यच असावे, अशा दृष्टीनें सारी पत्र्याची चाळ चंदूला बघत होती.

काकड्याने आणि चंदूने बाहेर आणलेले सामान घरात घेतले आणि व्यवस्थेने लावले; नंतर उरलेलें सामान आणण्यासाठीं ते दोघे बाहेर पडले.

चर्नीरोडच्या त्या इमारतीचा जिना चढून जाण्यासाठीं ते आंत शिरणार, इतक्यात तारा तिच्या घराकडून येतांना चंदूने पाहिली. त्याला वाटलें ती आपल्याला भेटायलाच आली असावी. दोन दिवस आपण तिला नुसतें भेटलों देखील नाहीं, म्हणून ती आपणावर रुसली तर नसेल. तो पुढें होऊन ताराशीं कांहीं तरी बोलणार होता, पण तेवढ्यांत तारा त्याला पाहून पलीकडच्या फूटपाथवर वळली आणि त्याच्या विरुद्ध दिशेला तोंड फिरवून निघून जाऊं लागली. चंदूनें "तारा–तारा" अशा एक दोन वेळां हाकाही मारल्या, पण ती मागें वळली नाहीं. चंदूचे

डोळे भरून येऊ लागले अश्रूंनी ! पण तितक्यांत काकडया पुढें झाला.

"चंद्या, तारा तुझ्याशीं बोलायला देखील तयार नाही. तिला तिच्या मोठेपणाचा दिमाख आहे, याचा सूड आज रात्री घ्यायचा आपण ! बोल, आहेस कबूल ?"

"म्हणजे ?" चंदूनें सभय गोंधळून विचारले.

"आपण या पोरीलाच पळवून नेऊन तिला कुठें तरी लपवून ठेवू या. तिच्या बापाकडून चांगले हजार बाराशे रुपये घेतल्याशिवाय त्याच्या ताब्यात तिला परत द्यायचे नाही !"

चंदूच्या मनाची काय स्थिति झाली असेल, त्याची नुसती कल्पनाच केलेली बरी. त्याला क्षणभर काय बोलावे ते देखील कळेना. तो काकड्याला म्हणाला,

"काकडया, अशा गोष्टी तू पुन्हा निदान माझ्याजवळ तरी बोलत जाऊं नकोस. अशी भयकर गोष्ट करायचं माझ्या स्वप्नांत देखील येणार नाहीं."

"हिच्यासारखी फायद्याची गोष्ट नाहीं" काकडया हीः हीः हीः करून हसत म्हणाला, "टिटव्या अशा गोष्टींत खरा पटाईत !" काकड्या हें सांगत असतांना चंदूच्या तोंडावर असा कांहीं भाव त्याला दिसला, कीं तो सागतां सागतां चरकलाच आणि बाजू सावरून घेण्यासाठीं तो म्हणाला,

"बाकी तुमची इच्छा नसली तर मला काहीच म्हणायच नाहीं. तस पाहिलं, तर मी तरी कुठं असल्या फदांत आहें ! आपलं म्हणजे अगदीं आटोक्यांतलं काम आहे. मी तुला टिटव्याविषयीं सागत होतों. त्याचा या बाबतींत अगदी हातखडा. त्या हिरामणशेठजीच्या पोरीची चलाखी आडवी आली म्हणून तर तो गेला तुरुंगात. पण पठ्ठया किती वेळां बाहेर सटकला त्या तुरुगांतून अन् किती वेळां पुन्हा धरला गेला ! गुरु आहे गुरु तो सगळ्याचा ! !"

पण चंदूच्या चेहऱ्यावरचा भाव वाढतच आहे, असे पाहून तो पुन्हा गडबडला आणि एकदम विषयांतर करून म्हणाला,

"बरं ते असूं दे. आतां चल वर, ही आता शेवटचीच खेप बरं का. या खेपेत सगळ सामान गेलंच पाहिजे पत्र्याच्या चाळींत तुझ !"

काकडयाने असें म्हणून जवळ जवळ ओढूनच वर नेले चदूला. 'साहेबा'शीं इतकी सलगी करणारा हमाल काहीं विचित्रच वाटला तिथल्या येणाऱ्या जाणाऱ्या लोकाना. ते आपले आ वासून त्यांच्या त्या वर जाणाऱ्या पाठमोऱ्या आकृतीकडे कांहीं वेळ पाहातच राहिले होते.

★

प्रकरण सतरावें

## पत्र्याच्या चाळीचें स्वरूप बदललें !

**पत्र्याच्या** चाळीत राहायला गेल्यापासून चंदूच्या जीवनांत एक अपूर्व क्रांति घडून आली. त्याचा सर्व फावला वेळ त्या ठिकाणीं राहात असलेल्या लोकांना निरनिराळ्या गोष्टीविषयी जागृति देण्यात जाऊं लागला. त्याच्याविषयी जो खोटा समज सबंध पत्र्याच्या चाळींत फैलावला होता, तो लवकरच नाहीसा झाला. तेथील लोकांनी त्याच्यावर हळू हळू विश्वास टाकायलाही सुरुवात केली. ते त्याच्या घरी येऊन त्याच्याजवळ आपल्या सुखदु:खाच्या गोष्टी बोलू लागले.

अगदी पहिल्याने ज्या वेळीं अयशाबी त्याच्या खोलीत आली, त्या वेळीं ती तर तेथील स्वच्छतेने आणि टापटिपीने दिपूनच गेली. चंदूनें काकडयाच्या मदतीने त्याची खोली घासून पुसून अगदीं लख्ख केली होती. ती पाहून अयशाबी म्हणाली,

"तुझी खोली म्हणजे एक महालच आहे रे बाबा. इतकी लखलख करतेय् कीं पुसूं नकोस !"

त्यावर चंदू म्हणाला होता,

"अयशाबी, तुला देखील तुझी खोली अशी लखलखीत करतां येईल, नाही का ?" आणि असें म्हणून अयशाबीला बोलायला देखील फुरसत न देतां चंदू काकडयाकडे वळून त्याच्या हाताला धरून त्याला उठवीत पुढें म्हणाला होता,

"चल ना रे काकडया, आज शनवार आहे. माझी दुपारची सुट्टी आज मी अयशाबीची खोली अशी स्वच्छ करण्याकडे घालविणार आहें. तूं पण चल मदत करायला—"

आणि काकड्याही यायला कबूल झाला होता. त्या दिवशी सध्याकाळपर्यंत अयशाबीच्या खोलीची अवकळा त्या दोघांनी पार बदलून टाकली होती. त्या नतर अयशाबीच्या शेजारणीने, मग तिच्या शेजारणीने आपल्या खोल्या साफ केल्या आणि एक महिन्याच्या आतच ती सगळी चाळ अगदी साफसूफ दिसायला लागली होती. कुठेही कचरा टाकणाऱ्या बाया तो आता डब्यात टाकायला लागल्या. नळावर पूर्वीच्याप्रमाणे खरकटी आणि इतर फेकून दिलेल्या वस्तूचा शिडकाव दिसेना. सर्व चाळ स्वच्छ दिसू लागली. तिच्यात पूर्वीसारखी दुर्गंधी येईना. चाळीत दररोज संध्याकाळी कुठें ना कुठें भजनाच्या बैठकी होऊ लागल्या आणि म्हातारी माणसे म्हणायला लागली,

"पाह्यलंत ? चदूने भजनाची पद्धत सुरू केल्यापासून एक माणूस चाळीत आजारी पडल नाही. देवनामाच सामर्थ्य कांहीं और आहे!"

सकाळच्या वेळी चंदूच्या खोलीवर पत्र्याच्या चाळींतील पोरासोरांची आणि म्हाताऱ्या माणसाची ही गर्दी जमायची. चंदू त्यांना वर्तमानपत्रांतील जर्मन कुठवर सरला वगैरे बातम्या वाचून दाखवायचा आणि नतर नंतर तर तशा बातम्या त्यांनाच वाचून पाहाता याव्यात म्हणून त्यानें तेथे साक्षरतेचे पाठ द्यायलाही सुरुवात केली.

अयशाबीच्या घराशेजारचा शामबाबा दोऱ्याने कानांशीं बांधलेला कळकट चष्मा चढवून वर्तमानपत्राच्या अकांवरून नजर फिरवतांना दिसायला लागला, तेव्हां तर चंदूच्या मनात आनदाचा पर्वत उभा राहिला.

आणि त्याच सुमारास साक्षरताप्रसाराची मोहीमही जोरानें सुरू झाली. चौकशीसमिती पत्र्याच्या चाळीत आली आणि त्याना जेव्हां तिथलीं माणसें चागलीं साक्षर दिसून आली तेव्हां आश्चर्याचा जणू काय धक्काच बसून ते स्तंभितच झाले. आपण नुसतींच बडीं बडीं व्याख्यानें देतों, आपली तुटकी फुटकी कामगिरी एखाद्या पत्रांतून छापून आलेली झळकली, की आपणांस धन्य धन्य वाटते; पण जे खरेखुरे सेवक आहेत,

त्यांच्या अशा कामाचे दर्शन झाले, कीं आपण किती क्षुल्लक आहोत याची जाणीव होऊन आपणास मान खाली घालावी लागते. याचा अनुभव त्या समितीला चागलाच आला.

“ चदू ? चंदू इथला देव आहे देव ! माणसाच्या उद्धारासाठीं देवाला जगांत माणूस होऊन याव लागत असं म्हणतात. चदूकडे पाहून आमची तरी निदान त्या बाबतींत खात्री पटली आहे. ” असे एका भाबड्या म्हाताऱ्यानें म्हटलेलें ऐकून तर चौकशी-समिती जागच्या जागींच थिजून गेली तिने चंदूची आस्थेनें चौकशी केली आणि दोन दिवसानीं एक जगी सभा होती तेथें येऊन आपल्या त्या सेवेच्या अनुभवाविषयीं दोन शब्द सागण्याची त्याला विनंति केली.

“ एखाद्या बड्या सभेत माझ्या सेवेची घमेड सांगावी आणि सगळ्या-कडून ‘ शाबास ’ म्हणून घ्यावी असें काहींही मी केलें नाहीं. करायला पाहिजेत अशा कितीतरी गोष्टी अजून आहेत आणि त्या गोष्टी करीत राहूं म्हटलें, तर सात जन्म देखील पुरे पडणार नाहीत. ” असें चदूचे उत्तर ऐकून ते सगळे लोक तर स्तभितच झाले.

“ तुम्ही निदान तिथे येऊन काय करायला पाहिजे त्याविषयी तरी बोला. त्याकडून निदान इतर सेवकांना काही मार्ग सापडेल, ” वगैरे प्रकारानीं बोलून त्या चौकशीसमितीनें चंदूला इतकी गळ घातली, की त्याच्यानें नाहीं म्हणवेना.

चौकशी-समिती आनंदानें चदूची कबूली घेऊनच त्या दिवशीं निघून गेली.

★

प्रकरण अठरावें

# गोड शेवट

सभामंडप माणसांनीं अगदीं फुलून गेला होता. अध्यक्षस्थानीं शेठ दयाराम घेलाभाई याना पाहून तर चंदूच्या आश्चर्याला सीमाच राहिली नाहीं. व्यासपीठावर आणखीही नामवत मंडळी बसलेली होती, पण त्या सगळ्यांहून चंदूच्या नजरेंत चटकन् भरली अशी व्यक्ति म्हणजे शेठजीची मुलगी तारा. चदूला ताराच्या जवळच जागा मिळाली. त्यानें एकदा दोनदा ताराकडे पाहून तिच्याशी काहीं तरी बोलण्याचा प्रयत्नही केला, पण तारा काहीं त्याला प्रत्युत्तर देण्याच्या मन स्थितींत दिसली नाहीं. चौकशीसमितीचा रिपोर्ट वगैरे बाबीकडेच आपलें अधिक लक्ष आहे असे दाखविण्याचा ती जाणून बुजून प्रयत्न करीत होती.

आणि नंतर चंदूची पाळी आली. शेठजीनीं चंदूचें नांव पुकारून म्हटलें,

“ ज्या लोकाची उन्नति व्हावी म्हणून आपण झटणार आहों, त्या लोकांत आपण कामाची सुरुवात करण्याच्याही अगोदर कांहीं लोकांनीं काम केलें आहे. आता ज्यांचं नाव मीं घेतलं ते तरुण गृहस्थही असेच एक कार्यकर्ते आहेत. त्याच म्हणणं आपण थोडा वेळ ऐकून घेऊं. ”

सभेंतील लोक माना उचावून पाहू लागले. चदू उभा राहिला. अगदीं साधा पण टापटिपीचा पोशाख, उच आणि सुदृढ शरीरयष्टी आणि डोळ्यातील कर्तबगारीनिदर्शक चमक पाहून प्रथमदर्शनींच लोकांचा त्याच्याविषयींचा ग्रह फार उत्तम झाला.

एकवार न भिता सरळ नजरेनें सभेंतील लोकांकडे दृष्टिक्षेप करून चंदूनें खड्या आवाजांत बोलायला सुरुवात केली—

"सेवा करण्यासाठीं सरसावणाऱ्या माझ्या बंधुभगिनींनो, ज्या लोकांची सेवा करण्यासाठीं तुम्ही कबर बाधीत आहां, त्या लोकांचीच सेवा करणारा मीही एक आज तुमच्यापुढें उभा आहे. मी देखील त्याच लोकांपैकीं एक आहें. नुसतेंच बोलायचे म्हणून मी बोलत नाहीं माझें म्हणणे अगदीं अक्षरशः खरें आहे. त्या लोकांत मी जन्मलो. आज इथें बसलेल्या अध्यक्षांनीं मला सुशिक्षण देऊन त्याच लोकांची सेवा करण्यासाठी लायक केलें—"

चदूचे तें बोलणे ऐकून सभेतील लोकांनी आनदाने टाळ्याचा कडकडाट केला. सुरुवातीला चंदू जरा दबल्यासारखा बोलत होता, पण नतर प्रत्येक वाक्यागणिक त्याला स्फुरण चढू लागलें. आवाज अगदीं खणखणीत आणि प्रत्येक वाक्यातून ओसंडणारा मूर्तिमंत जिव्हाळा लोकावर मोहिनी घालू लागला. एवढा मोठा जनसमर्द, पण अगदीं तटस्थ बसलेला. चंदूची वर्णनशैली इतकी प्रभावी, की हळव्या मनाच्या लोकाच्या डोळ्याच्या पापण्या ओल्या होऊ लागल्या. त्याच्या आवाजांतील कंप दगडासारख्या हृदयांतूनही सरळ आंत शिरून त्या हृदयातील खोल कप्प्यांत दडलेल्या कोमल भावनांच्या तारा छेडूं लागला. त्याने पत्र्याच्या चाळीतील दारिद्र्याचे आणि अज्ञानाचें मूर्तिमंत शब्दचित्र रंगवून "ही माणसं देखील तुमच्या आणि माझ्या इतकीच माणस आहेत; त्याना देखील नीति आवडते, स्वच्छता आवडते, ज्ञानलालसा आहे, पण परिस्थितीमुळे त्यांची ही भूक त्यांना मारून टाकावी लागते" असे प्रतिपादन केले. या लोकांची उन्नति करायची ती व्याख्याने देऊन नव्हे, अगर चार दोन तास त्यांच्यांत जाऊन, त्यांना कांहीं तरी पोपटपची शिकवूनही नव्हे तर त्यांच्यांत त्यांच्यासारखे बनून आणि त्यांनी जसें राहावे असें वाटतें तसे राहून दाखवूनच ती उन्नति कार्यकर्त्यांना घडवून आणतां येईल असेही त्यानें जोराने प्रतिपादन केले.

आरंभी आरंभीं त्याच्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष दाखविणारी तारा हळू हळू प्रफुल्लित दिसूं लागली. त्याच्याकडे आदराने आणि प्रेमानें

पाहून ती मनापासून त्याला प्रोत्साहन देऊ लागली, तसतसे चंदूचें व्याख्यान अधिकाधिक रंगांत येऊं लागले.

तेथील लोकाची गरिबी आणि अनीतिकडे प्रवृत्ति यांचा परस्पर संबंध दाखवून चदूने असे प्रतिपादन केले, कीं "या सगळ्याला जबाबदार जर कोण असेल, तर त्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना पायदळीं तुडविणारा व दुसऱ्याच्या श्रमावर पोसला गेलेला सुखवस्तु लोकाचा वर्ग. आजपर्यंत हा जो शाप त्याला लागला आहे त्यांतून मुक्त व्हावें असें जर त्याला वाटत असेल, तर त्याने नुसतीच शाब्दिक सहानुभूति न दाखविता कांहींतरी सक्रिय मदत करून, साक्षरतेच्या या चळवळी-बरोबरच या लोकांच्या आर्थिक सुस्थितीकडेही लक्ष द्यावें. हाडा-मांसाच्या या लोकाची वसतिस्थानें पाहा. जनावराचे गोठे त्यापेक्षां कितीतरी पटीने चागले दिसतात. या गरीब बिचाऱ्या लोकांना त्या खुराड्यांतून कोबून ठेवून आपण मात्र पराच्या गादीवर लोळायचे याला माणुसकी कशी म्हणता येईल ? मी कुणावर तरी उगीचच तोंडसुख घ्यावें, म्हणून इथ आलों नाही; तर माणसांच्या माणुसकीला वाचा फोडावी म्हणून मी हा आक्रोश करीत उभा आहे."

टाळ्याच्या प्रचड कडकडाटांत चंदू खाली बसला. अध्यक्षीय समारोप करतांना शेठजी दाटलेल्या कंठाने म्हणाले,

"चौकशीसमितीला आजचें भाषण करणाऱ्या सेवकाने कांहीं सूचना केल्या आहेत. त्या सूचनांना मूर्त स्वरूपात आणणारी व्यक्ति या सेवकाखेरीज मला तरी दुसरी कोणी दिसत नाही. त्यांना स्वतत्रपणानें कार्य करण्याची हौस आहे. दलितवर्गाची कळकळ त्यांच्या रोमारोमांतून भरून राहिली आहे. त्याच्या या भाषणावरून मला माझें कर्तव्य दिसूं लागलें असून मी या ठिकाणी एक आनदाची गोष्ट जाहीर करूं इच्छितों. या सेवकाच्या मनांतून ज्या आकाक्षा आहेत त्या त्याला पुऱ्या करतां याव्यात म्हणून त्याला मी सक्रिय मदत करण्याचें ठरवलें आहे."

शेठजींचें भाषण चालू असतांनाच या ठिकाणीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. ताराने देखील मनापासून टाळ्या पिटून चदूकडे मोठ्या प्रेमानें पाहून स्मित केले त्याच सभेत चंदूच्या कार्याला सक्रीय मदत म्हणून शेठजींनी मुंबईबाहेरील आपली एक फार मोठी पिकाऊ जमीन त्याला देणगी म्हणून जाहीर केली. त्याचप्रमाणें बऱ्याच मोठ्या रकमेची थैलीही देण्याचे जाहीर केले.

चंदूच्या डोळ्यांतून आनदाश्रूचा पूर वाहात होता. सभेनतर शेठजी आणि तारा त्याला घेऊन आपल्या घराकडे निघाले. ताराच्या 'मा'ला शेटजींनीं व ताराने सभेत घडलेला सर्व वृत्तात निवेदन केला. तिच्या स्वभावाप्रमाणें ताराच्या 'मा'ने नाक तोंड मोडलें खरे, पण एवढ्या देणगीवर जर ही ब्याद आपल्या घरातून कायमचीच निघून जात असेल, तर तेही एका दृष्टीनें ठीकच झालें, असे तिनें स्वतःच्या मनाचे समाधान केले.

:: :: ::

ताराच्या घरून चदू पत्र्याच्या चाळीकडे निघाला होता. तारा त्याला पोचवायाला खाली आली. चंदूचा निरोप घेतां घेतां चंदूला ती म्हणाली,

"आमच्या घरीं तूं येतोस, ते 'मा' ला नाही आवडत. तिनें तुला येऊ नको म्हणून सांगितले, तेही मला आतां माहीत झालें आहे."

चंदूची छाती धडधडू लागली. तारा पुढे म्हणाली,

"आणि मी स्वतः होऊन तुमच्या घरीं येणार नाहीं असे तू तिला म्हणाला होतास, तेही मला कळलें."

चदू एकदम गंभीर होऊन कांहीं तरी बोलणार असें दिसले. पण ताराच म्हणाली,

"मी देखील तुला आता तेच सागणार आहे. तूं आमच्या घरी येणे मलाही पसंत नाहीं. तुझा जन्म झाला त्याच लोकांत तूं राहिले पाहिजे."

सजल नेत्रांनी चंदूनें ताराचा निरोप घेण्याचा प्रयत्न केला. पण तारा म्हणाली.

" थाब रे चदू, अजून माझ सगळंच बोलणं संपलं नाहीं. इतकी घाई कसली झाली आहे तुला ? "

" तारा, मी तुला वचन देतो कीं मी फिरून तुझ्या घरीं येणार नाही. "

" ठरल तर मग .." तारा त्याला मध्येंच थाबवून म्हणाली, " तू माझ्या घरीं यायचं नाहींस अगदी तुझ्यासारख बनून मीच तुझ्या घरीं यायचं !

★

# रॉबिन्सन क्रूसो

## अनुवादक—वि. स. सुखठणकर

'सिंदबादच्या सफरी' इतकेंच मनावेधक असलेल्या या पुस्तकाचा मूळ इंग्रजीवरून श्री. सुखठणकर यांनीं मुलांसाठीं संक्षिप्त अनुवाद केला आहे. भयंकर वादळांत गलबत सापडल्यावर जीव वाचविण्यासाठी एका निर्जन व ओसाड बेटाचा रॉबिन्सन क्रूसोनें आसरा घेतला. तेथे त्यानं आपला संसार कसा थाटला, एक नवा मित्र कसा मिळविला आणि अखेर त्या बेटावरून त्याने आपली सुटका कशी करून घेतली ही सारीच हकीकत अत्यंत मनोवेधक व मनोरंजक आहे. मुले तर पुस्तक हातात घेतल्यानंतर रॉबिन्सन क्रूसोप्रमाणेच एका नव्या व अद्भुतरम्य सृष्टींत रंगून जातील.

**पृष्ठें ३६, सुंदर चित्रें, मूल्य पांच आणे**

★

# डॉन क्विक्झोट्चे पराक्रम

## लेखक—मा. पं. शिखरे, बी. ए, एल्एल्. बी.

सरव्हँटिस् या स्पॅनिश लेखकाच्या जगप्रसिद्ध कादंबरीचे मुलांसाठीं तयार केलेले हे संक्षिप्त रूपांतर आहे. रॉबिन्सन क्रूसो, सिंदबाद याप्रमाणेच क्विक्झोटही मुलांना वेड लावील व आपल्या अचाट पराक्रमांनीं त्यांस पोट धरधरून हसावयास लावील या विख्यात कादंबरीचें मराठी भाषांतर ज उपलब्ध नाही व ही उणीव लक्षात घेऊनच बालवाचकांसाठीं खास या नावीन्यपूर्ण पुस्तकाची योजना केली आहे. पाश्चात्य वाङ्मयकृतींचीं लहान मुलांसाठीं रूपांतरें करण्याच्या उपक्रमातीलच हें एक पुढचें पाऊल आहे.

---

**केशव भिकाजी ढवळे, मुंबई ४**